
अभिधेयं परम साम्यम्

# साम्ययोग साधना

◆ वर्ष-१२ ◆ अंक - १० ◆ दिनांक : १६ डिसेंबर २०११ ◆ मूल्य ७ रु.

## चिरंतन विश्वस्त कल्पना



माझी विश्वस्त कल्पना कामचलाऊ नाही. माझ्या मनातले खरे लपविण्यासाठी म्हणून रचलेले पांघरुण तर ते नाहीच. इतर सिद्धांत विरून गेले तरी हा कायम राहील. कारण त्याच्या बुडाशी धर्म आणि तत्त्वज्ञान आहे. विश्वस्त व्यवस्था कायदेशास्त्राची एक कल्पना तेवढी आहे, व्यवहारात तिचे कोठे दर्शन घडत नाही असे म्हणता येईल. पण आम्ही तिचा विचार करू आणि त्या दिशेने प्रयत्न करू तर कायद्यापेक्षा प्रेम जास्त सबळ आहे हे सहज पटेल.

– म. गांधी

(मेरे सपनो का भारत)

## पद्मश्री भवरलालजी जैन अमृत महोत्सव वर्षारंभ विशेष

अहिंसेद प्रस्त साधना

# साम्ययोग साधना

वर्ष - १२ अंक-१०

वार्षिक वर्गणी- १५० रुपये

१५ वर्षाची आजीव वर्गणी- १५०० रुपये

**संपादक**

रमेश दाणे

**संपादक मंडळ**

आबा कांबळे (मुंबई) पदसिद्ध, डॉ.मु.ब.शहा (धुळे) डॉ.सुगन बरंठ (मालेगांव), डॉ.सोमनाथ रोडे (लातूर) आशुतोष देशपांडे (बुलढाणा), शोभा शिराढोणकर (औरंगाबाद), मा.तु.खैरकर (ठाणे)

**नियामक मंडळ**

डॉ.गंगाप्रसाद अग्रवाल (वसमत),
डॉ.श्रीराम जाधव (औरंगाबाद),जयवंतराव मठकर(पुणे),
ॲड.मा.म.गडकरी (सेवाग्राम),हुसेन जमादार (कोल्हापूर)

**ई-सहकारी**

स्वाती भाटिया (पुणे) सत्यजीत जाधव (औरंगाबाद), प्रांजल दीक्षित (नाशिक) डॉ.अपश्चिम बरंठ (मालेगांव)

**मुद्रक-प्रकाशक**

संजय भास्कर जोशी

दर महिन्याच्या १ व १६ तारखांना प्रसिद्ध होतो.

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी प्रकाशक व संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यालय**

साम्ययोग साधना

४५, प्रमोद नगर, सेक्टर - ३, नकाणे रस्ता,
देवपूर, धुळे - ४२४००२
टेली फॅक्स: (०२५६२) २२६४१४,२२६४०७
samyayog_sadhana@yahoo.co.in
rameshdane@yahoo.co.in

**मुखपृष्ठ**

महात्मा गांधी व दे.भ. जमनालाल बजाज

# संपादकीय...

## प्रकाशाचे बेट

गांधीजींनी भारताच्या आर्थिक समानतेचा विचार प्राधान्यक्रमाने केलेला आहे. त्यांची ग्रामस्वराज्याची अथवा स्वावलंबी गावांची कल्पना ग्रामीण अर्थव्यवस्थेशी निगडीत आहे. खेडी समृद्ध आणि स्वयंसिद्ध व्हावीत. ती परावलंबी राहू नयेत. शहरीकरण व यांत्रिकीकरण हा या देशाच्या विकासाचा मार्ग नाही असा गांधीजींचा कटाक्ष होता. सर्व कल्याणकारी जीवनपद्धती या देशात विकसित करावयाची असेल तर सर्वप्रथम आर्थिक समता प्रस्थापित करावी लागेल. आर्थिक समतेच्या संदर्भातला आणखी एक महत्त्वाचा मुद्दा त्यांनी चर्चिला आणि तो म्हणजे धनिकांनी विश्वस्तांप्रमाणे वागण्याचा. धनिक जर विश्वस्तांप्रमाणे वागले तर मोठी समाज क्रांती घडून येईल अशी त्यांची श्रद्धा होती. धनिकांकडून त्यांचे धन हिरावून घेतले तर ती हिंसा होईल. शिवाय हिंसेतून समाजाचा काहीच फायदा होणार नाही. उलट उत्पादन करणारा माणूस संपून जाईल. म्हणून एकच पर्याय आहे. आणि तो म्हणजे स्वत:साठी अथवा स्वत:च्या परिवारासाठी आवश्यक गरजा भागविण्याइतके धन जवळ बाळगावे आणि बाकीचे गरिबांचे विश्वस्त म्हणून बाळगावे अशी ही कल्पना आहे. आजच्या चंगळवादी जीवनशैलीच्या कालखंडात हा विचार म्हणजे मुर्खपणा ठरेल. कारण जागतिकीकरण व उदारीकरणाच्या झंझावातात हावरटपणात कमालीची वाढ झाली असून आपले ते तर आपलेच पण दुसऱ्यांचेही आपलेच अशी वृत्ती सारखी वाढते आहे. निसर्गाचे दोहन करून स्वत:ची घरे भरण्याची आणि सुखद, मऊ जीवन जगण्याची अहमहमिका लागलेली असतांना पर्यावरणाच्या चर्चांची खिल्ली उडविणारांची संख्याही वाढते आहे. जगातले मोजके श्रीमंत यावर ब्र शब्द बोलण्यास वा थोडीही कृती करण्यास तयार नाहीत. अशावेळी सर्व सामान्य माणसावर निसर्ग, समाज,देश व कुटुंब कबिल्याचे रक्षण, पोषण करण्याची जबाबदारी येऊन पडते. सध्या आपला देश याच सामान्य माणसांच्या भरवशावर उभा आहे.

मात्र अशी परिस्थिती असतांना औद्योगिक क्षेत्रात प्रथितयश उद्योजक म्हणून ओळख असणारा एखादा परिवार जेव्हा गांधीजींचा ट्रस्टीशिपचा विचार करतो आणि तो प्रत्यक्षात अंमलात आणतो. तेव्हा सारे काही अद्यापि संपलेल नाही याची खात्री पटते.

प्रकाशाची बेटे असतात ती अशी. जळगावच्याच नव्हे तर देशाच्या व जगाच्या औद्योगिक क्षेत्रात खास करून भूमिपुत्रांशी निगडीत असलेल्या उद्योगांची उभारणी करून आपली उद्योजकता दरवर्षी ४५०० हजार कोटी रूपयांच्या उलाढाल पर्यंत पोहचवणाऱ्या जैन उद्योग समुहाने गांधीजींचा हा विचार अंमलात आणला आहे. या समुहाचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री भवरलालजी जैन यांच्या अमृतमहोत्सवी वाढदिवसानिमित्त हा विषय येथे आम्ही मुद्दाम स्पर्शिला आहे. त्यांच्या व त्यांचे मोठे चिरंजीव अशोक भाऊ जैन यांच्या सविस्तर मुलाखतीतून जो सूर उमटला आहे. तो आस्वस्त करणारा असून कुणाही बुद्धीप्रामाण्यवादी व्यक्तीला विचार करायला प्रवृत्त करणारा आहे. जळगावात काय किंवा देशभरात कुठेही उद्योग करणारांनी थोडीजरी विश्वस्तव्यवस्था स्वीकारली तरी त्यांना त्यांच्या जीवनाचे सार्थक झाल्याचे समाधान मिळेल. त्यासाठी भवरलाल भाऊ जैन यांच्याकडे अशांनी मार्गदर्शक म्हणून बघणे आवश्यक आहे. व्यापक, विशाल व सखोल विचारांचे व त्यानुसार ते कृतीत आणण्याच्या प्रयत्नांचे प्रतीक म्हणून भाऊंकडे बघावे लागेल.

खरोखरच शतकातून एखादेच असे व्यक्तिमत्व जन्माला येते ते खानदेशच्या भूमित आले याचा आम्हाला अभिमान आहे. पू. साने गुरुजींनी आपल्या पदस्पर्शाने पावन केलेल्या खान्देशच्या भूमित अशीच हिरे माणकं जन्माला यावीत अशी त्यांची इच्छा होती. समाजवादाच्या दिशेने या प्रदेशाने वाटचाल करावी अशीही त्यांची इच्छा होती. प्रतापशेठजींचा त्यांच्यावर विशेष स्नेह होता. आदर होता. त्या गुरूजींच्या 'श्यामच्या आईचा' परिणाम भाऊंच्या जीवनावर आहे. गांधी आणि साने गुरुजींच्या संयुक्त कारुण्याचे दर्शन त्यांच्या व्यक्तिमत्त्वातून होते.

जैनीझमचे तत्त्वज्ञान व्यापक पातळीवर नेऊन त्याचे सार्वत्रिकीकरण अर्थात सर्वधर्मसमभाव प्रस्थापित करण्यापर्यंत ते तत्त्वज्ञान पोहचविण्याचे काम गांधीजींनी केले. त्याच पद्धतीने, कोशात न राहता भाऊंनी समाजाच्या सर्व स्तरांना काही तरी देत राहण्याची भूमिका सातत्याने स्वीकारली. त्यातूनच पुढे गांधीजींचा विचार नव्या पीढीपर्यंत पोहचविण्याची संकल्पना आकाराला आली. जगात युनोने गांधीजींची जयंती जागतिक अहिंसा दिन म्हणून स्वीकारली. अंमलात आणली. अणुबॉम्ब मुक्त, शांत जीवन जगण्यासाठी आता अनेक देश गांधी विचारांचा सकारात्मक अंगिकार करीत आहेत. अनेक छोटे देश गांधीजींचा निसर्गाशी साधर्म्य राखणारा मानवी कल्याणाचा कार्यक्रम राबवित आहेत. आपली अर्थव्यवस्था त्या दिशेने नेऊ पाहात आहेत. याचा अर्थ गांधी विचार आता जगाच्या दृष्टीने केवळ अहिंसेपुरता मर्यादित राहिलेला नसून त्याचा संबंध दैनंदिन जीवन व्यवहाराशी जुळला आहे. म्हणूनच गांधी प्रणित अर्थव्यवस्थेचा विचार हे देश करीत आहेत. त्याचवेळी मात्र गांधी अप्रासंगिक असल्याची बतावणी त्यांच्याच देशात होते आहे. ही अतिशय दु:खाची बाब असून ही स्थिती अशीच राहिल्यास हा देश रसातळाला जाईल. व्यक्तिगत जीवनात कुठलीच नैतिकता राहणार नाही. अशी चिंता भवरलाल भाऊंना सतावत होती म्हणून नव्या पीढीला त्यांना भावणाऱ्या माध्यमातून गांधी कळावेत यासाठी गांधीतीर्थाची उभारणी ते करीत आहेत. जगभर स्मृतिस्थळे, संग्रहालये आहेत. परंतु जैनहिल्सवरचे गांधी म्युझियम अनोखे असणार आहे. जगातले एकमेव असणार आहे. कोणत्याही स्तरावरचा माणूस ते बघण्यासाठी येवो तो येथून काहीतरी विचार घेऊन गेला पाहिजे असा प्रयत्न आहे. अशा पद्धतीचा विचार म्युझियमच्या माध्यमातून आजपर्यंत तरी कुणी केला नाही. तो भाऊंनी केला आहे. त्यांचा परिवार त्यांची ही संकल्पना पुढे नेणार असल्याने भावी काळातली या संदर्भातली चिंता कुणालाच करावी लागणार नाही हे महत्त्वाचे. म्हणूनच त्यांचे पंचाहत्तरीचे पदार्पण समाजाच्या दृष्टीने आश्वासक ठरावे.

देशभक्त जमनालाल बजाज यांना गांधीजी आपले पाचवे पुत्र मानत असत. गांधीजींच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर एवढा होता की स्वातंत्र्याच्या आंदोलनात, ऊडी घेतांनाच जीवनाच्या अखेरच्या काळात ते झोपडी बांधून राहू लागले. अपरिग्रहाचा हा उच्चांक होता. टाटा उद्योग समूह, बिर्ला परिवार, खिरा स्टिल्स आणि अलिकडच्या काळात विप्रोचे अझिम प्रेमजी यांनी ट्रस्टीशिपची संकल्पना स्वीकारली होती. त्यात बरीच पडझड झाली परंतु जैन परिवारातील तरुण घटकांनी आपणहून आपल्या वडिलांना संपत्तीचा ट्रस्ट करायला सांगितला हे विशेष होय. एकार्थाने गांधीविचारांचा, त्या प्रभावाचा, व त्यावर हुकूम जीवनात वागणाऱ्या भवरलाल भाऊंचा हा विजय आहे. ही परंपरा पुढे नेण्यासाठी, गांधीजींचा विचार, तत्त्वज्ञान, गांधीतीर्थाच्या माध्यमातून पुढे नेण्यासाठी त्यांना निरामय आरोग्य व आयुष्य लाभो अशी प्रार्थना.

– संपादक

हृद्‌गत

## नवी पीढी घडविण्यासाठी गांधीतीर्थाची उभारणी: ऋणांची परतफेड करण्याचा प्रयत्न
## अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करतांना पद्मश्री भवरलाल भाऊ जैन यांची नम्र भावना

देशात सरकारी, निमसरकारी, स्वयंसेवी व खाजगी पातळीवर गांधीजींच्या आठवणी जपून ठेवलेल्या आढळतात. संग्राहलये, ग्रंथालये, उपलब्ध आहेत. आपल्या देशात आहेत तशी परदेशातही अनेक ठिकाणी गांधीजीची स्मृतिस्थळे आहेत, परंतु या सर्वापेक्षा अधिक तेजस्वी दिसणारा कोहिनूर जळगावला जैन हिल्सवर प्रस्थापित होत आहे. न भूतो न भविष्यती अशी गांधी रिसर्च फाऊंडेशनची व गांधी तीर्थाची उभारणी इथे होत आहे. जगातल्या आश्चर्यामध्ये आणखी एका आश्चर्याची भर पडेल असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही. एवढी त्याची व्याप्ती आहे. महाराष्ट्र आणि खानदेशच्या व देशाच्या वैभवात मोलाची भर टाकणाऱ्या या गांधीतीर्थाच्या निर्मितीचे जनक पद्मश्री भवरलालभाऊ जैन यांनी वयाची ७४ वर्षे पूर्ण करून ७५ व्या वर्षात पदार्पण केले आहे. भूमिपूत्रांच्या कल्याणातच आपले कल्याण सामावले असल्याची भावना त्यांच्या मनात आहे. ही भावना जपत असतानाच जगाला तारणाऱ्या म. गांधीजींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाची त्यांच्याच देशात आबाळ होते आहे काय? या प्रश्नांनी भाऊंचे मन अस्वस्थ झाले आणि या अवस्थेतूनच नव्या पिढीपर्यंत त्यांना भावणाऱ्या संकल्पनेतून गांधीजींचा विचार पोहचविण्याचा संकल्प सोडला. अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करताना त्यांच्याशी साम्ययोग साधनेच्या चमूने या संदर्भात मनमोकळी चर्चा केली. त्यातून त्यांची यामागची भूमिका स्पष्ट झाली असून वाचकांना ती निश्चितच भावेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

– संपादक

प्रास्ताविक : भाऊ आपण ७५ व्या वर्षात पर्दापण करीत असताना 'ती आणि मी' आम्ही वाचलं आहे. त्यात कौटुंबिक जो काही आपला जिव्हाळ्याचा भाग आहे किंवा कर्तव्याचा मुद्दा आहे तो येऊन गेला. त्यातली सर्व उद्योगांची उभारणी 'ग्रॉस रुट'च्या माणसांसाठी झालेली आहे. त्यातला गोषवारा त्याच्यात आला आहे. हे करीत असताना आता सत्तरी पार केल्यानंतर आपल्याला गांधींच्या संदर्भातले काम इथे उभे रहावे आणि देशाला, नवीन पिढीला मार्गदर्शन व्हावं ही जी प्रेरणा आपल्यामध्ये आली तो मुख्यत: आपल्या मुलाखतीचा भाग आहे, त्याच्यावर आपण भाष्य करावे.

निवेदन – आपण इथे बघताच आहात की या ऑफिसमध्ये तीन आणि तीन असे सहा फोटोग्राफ्स लागले आहेत. आई–वडिलांनी तर माझे अस्तित्वच दिले. ही सृष्टी दाखवायला जर कोणी जबाबदार असेल तर ते आईवडीलच आहेत. एक नवीन सृष्टी निर्माण करण्यामध्ये ज्यांनी अहम भूमिका बजावली त्यात पत्नी आहेत. म्हणून आई–वडील आणि पत्नी हे तीन फोटोग्राफ्स तुम्ही इथे बघता आहात. पण त्याचबरोबर जे अन्य तीन आहेत त्यात पहिला फाटोग्राफ गांधीजींचा आहे.

पहिला फोटोग्राफ गांधीजींचा का ठेवला? इथे तुम्हाला एवढ्या मोठ्या ऑफिसमध्ये २,००० स्क्वेअर फुटाच्या ऑफिसमध्ये हे एवढेच दिसत आहे. बाकी कुठे काही दिसत नाही, बाकीची सगळी ही पुस्तके आहेत. तर मला गांधीजींबद्दल एक विलक्षण असे प्रेम, मी 'सत्याचे प्रयोग' वाचल्यानंतर म्हणजे साधारणत: वयाच्या १२ व्या, १३ व्या वर्षापासून त्यावेळेला फार कमी समजले. पण १८ किंवा १९ वर्षाला आणखी प्रसंग आला आणि त्याचे हिंदी भाषांतर वाचले.

खूप विलक्षण असे वाटले की कमालीचा माणूस. एवढे सत्य बोलू शकतो आणि स्वत:च्या चुका जगापुढे मांडू शकतो हेच पटत नव्हते आणि आज या मुक्कामाला पोहोचल्यानंतरही ते पटणं कठीण आहे. आपण जे म्हणालात की 'ती आणि मी' आपण वाचले आहे. त्याच्यामध्ये जी एक पारदर्शकता आहे त्या पारदर्शकतेचा सुद्धा तिथून उगम आहे. ते जर एवढे स्पष्टपणे लिहू शकतात तर मग आपल्याला लिहायला काय हरकत आहे आणि आपल्याला आश्चर्य वाटेल की याच्यात आणखी दोन एक प्रसंग मी एवढ्या जवळून लिहिलेले होते की माझ्या सगळ्या इथल्या

ऑफिसमधल्या लोकांनी जे लिहून घेत होते, जे टाईप करत होते या सगळ्यांनी त्याला ऑब्जेक्शन घेतलं.

प्रश्न-अशी कुठली गोष्ट आहे?

उत्तर - भाऊ, तुम्ही आता ज्या मुक्कामाला आहात त्या मुक्कामाला असे हे सगळे वर्णन करणे शोभत नाही आणि ते आम्हाला वाचायला सुद्धा आवडणार नाही. तुमच्या तोंडी आम्हाला ते आवडणार नाही. हे रोज सगळी माणसे करतात, हे रोज सगळे असे घडते याची आम्हाला पूर्णपणे कल्पना आहे. परंतु ते नको. आता या सगळ्यांच्या विरुद्ध जाऊन ते दोन प्रसंग त्या पुस्तकातून काढायचे हे शेवटच्या दिवसापर्यंत मी काही होय म्हणालो नाही. परंतु शेवटच्या दिवशी त्यात थोडा बहूत बदल करून ते प्रसंग मी लिहिले. ज्यामध्ये नरोबा-कुंजरोबा अशी भूमिका घेतली. खोटं बोललो नाही आणि खरेही बोललो नाही. आपल्याला आश्चर्य या गोष्टीचं वाटायला पाहिजे की गांधीजींचे बालपण आत्ता वाचतांना मला हे वाटते की त्यांनी सुद्धा एक किंवा दोन ठिकाणी अशीच भूमिका घेऊन लिहिलेले आहे.

त्यामुळे मीही करायला पाहिजे असे मला वाटले नाही असा काही विषय नव्हता. परंतु मागे वळून बघताना मला असे वाटले की निदान आपण जर चुकीचं करत असू तर त्यात गांधीजीसुद्धा भागिदार आहेत. (हास्य) चुकीचे करत असू तर, पण करत नसू तर तो भाग वेगळा आहे. दोन ठिकाणी अशी संदिग्धता आहे.

म्हणजे काय की, वडील कदाचित विषयाला आहारी जात असावेत. असल्या प्रकारचे ते वर्णन आहे. गुजराथीमध्ये आहे. आणि ते आम्ही वाचले, खूप वाचले. एक वेळा नाही दहा वेळा वाचले आणि याचा नेमका अर्थ काय आहे हे लावायचा प्रयत्न केला. विषयांचे म्हणजे शब्दांचे अर्थ सगळ्यांनाच माहिती आहे त्याच्यासाठी शब्दकोष आहेत, परंतु भावनांच्या अर्थासाठी काही नाही.

तर ते कसं करणार? आणि मग याचाच पर्याय पुढे झाला असेल आणि इतर गोष्टी सुद्धा गांधीजींनी ज्या लिहिलेल्या नाही, परंतु त्यांच्या पत्रांमध्ये त्या आहेत. त्यांनी त्या लपवल्या नाहीत. त्यांनी ती पत्रे फोडली म्हणजे फाडून टाकली नाहीत. ती पत्र सीडब्ल्यूएमजीमध्ये सुद्धा आहेत. त्याच्यामध्ये मीराला लिहिलेले एक पत्र, त्याच्यामध्ये एक दुसरी जी व्यक्ती आहे 'कलन बॅग'ला लिहिलेली पत्रे आहेत. तर मग त्यांनी याची सगळी चर्चा का केली नाही? म्हणजे या सत्याच्या प्रयोगामध्ये किंवा इतर प्रयोगामधे असे वाटायला लागले आणि त्याच वेळा मनामध्ये विचार चमकला की माणसाचा मोठेपणा हा त्याने काही केले याच्यात नाही. त्यांनी जे काही केलं असेल ते सांगण्यामध्ये आहे आणि ते जीवंत ठेवण्यामध्ये आहे. रवींद्रनाथ टागोरांनी जसे म्हटले ना की 'ईश्वरा मला कोणतेच दुःख देऊ नको, मला कोणताच त्रास देऊ नको असं मी म्हणत नाही, अशी माझी मागणी नाही, माझी मागणी ही आहे की जो काही त्रास किंवा जे काही दुःख होणार असेल त्याला सामोरं जाण्याचं धैर्य मला दे' हे त्यांचे म्हणणे आहे. तर मी काहीच चुकीचं केलं नाही असं म्हणण्याची गांधीजींची भूमिका असावी किंवा आपण ती गृहित धरावी याला काही अर्थच नाही. परंतु त्या माणसाकडे काही वेगळं असेल तर ती गोष्ट निर्भिडपणे समाजासमोर ठेवता आली आणि त्याच्यामधून इतरांनी धडा शिकावा या भावनेने त्यांनी ती मांडली. मला असं वाटतं की या गोष्टीचं फार मोठं महत्त्व आहे.

महात्मा याच्यामुळे नाही झाले गांधीजी की त्यांनी काही चुकचे काम केलेच नाही किंवा जे ज्याला सर्वसाधारण माणूस बळी पडतो अशा गोष्टींना ते बळी पडलेच नाही. त्याच्यातून शिकले आणि शिकून सबंध देशाला उभं केलं. संबंध समाजाला उभं केलं. स्वतःच्या धर्माला शेवटपर्यंत विसरले नाही. रामावरची श्रद्धा शेवटपर्यंत कायम राहिली. सगळ्या धर्माचा अभ्यास केला, प्रत्येक धर्माची मैत्री केली, प्रत्येक धर्मियांशी मैत्री केली. मनापासून केली. हे सगळं करत असताना स्वतःचा धर्म जो काही असेल तोही नाही सोडला. पहिल्या मुलाचं लग्न करत असताना ते त्या जातीच्या बाहेर व्हावे अशी त्यांची इच्छा नव्हती. मग आपण गांधीजींना जातीनिष्ठ म्हणणार का? प्रश्न पडतो. एवढा मोठा माणूस ज्यांनी एवढे सगळं मानवतेबद्दल काम केलेले आहे त्यांनी एवढं संकुचितपणे का करावे? त्याच्यानंतर पुढे आणखी काय झाले हा इतिहास आहे किंवा त्यांच्या मुलाच्या मुलांनी म्हणजे त्यांच्या नातवाने काय केले हाही एक इतिहास आहे.

त्याच्यानंतर तेही बदलले, पण जे काही घडले, जसे काही घडले तसे जीवन लोकांच्या समोर मांडण्याला जे एक नैतिक अधिष्ठान लागते, तर मला स्वत:ला असे वाटतं की यावरून मी जे काही शिकलो असेल माझ्यावर गांधीजींचा पगडा असेल तर तो जीवन जगावे कसे? ही दिशा मूळ तिथून मिळाली.

दुसरा फोटोग्राफ मी इथे जवाहरलाल नेहरूंचा लावला आहे. तर मला असे वाटते, स्वप्न कशी पहावी हे जर कुठे शिकायचं असेल तर त्याच्यासाठी जवाहरलाल नेहरूंचीच शिकवणी घ्यावी लागेल. एवढी मोठमोठाली स्वप्न पहाणे सर्वसाधारण माणसाचं काम नाही. आणि तिसरा फोटोग्राफ इथे जो आहे तो जे. आर. डी. टाटांचा आहे. सामाजिक बांधिलकी चांगल्याप्रकारे घट्ट रितीने बाळगूनसुद्धा तुम्ही व्यवसाय करू शकता, तुम्ही दोन पैसे कमवू शकता, परत त्या समाजामध्ये परतफेडीच्या नियतीने ते तुम्ही कमवता आणि तसं काम करता हे जे. आर. डी. टाटांनी स्वत:च्या आयुष्यात दाखवून दिले.

पैसा कमवला नाही असे नाही. खूप पैसा कमवला. देशातला एक नंबरचा उद्योग म्हणून उभा केला. सामाजिक बांधिलकी जपली. फॅक्टरीत पगाराला पैसे नाही म्हणून स्वत:च्या पत्नीचे दागिने गहाण ठेवून त्यांनी फॅक्टरी चालवली. वर्कर लोकांना उपाशी राहू दिले नाही. एवढ्या मोठ्या उच्च दर्जाची सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे हा धडा मी त्यांच्याकडून घेतला आणि म्हणून हे तीन फोटोग्राफ तुम्हाला इथे दिसतात.

तर 'जगावे कसे' याच्यात तर सगळंच येत मग याच्यात सामाजिक बांधिलकीसुद्धा आली. यात स्वप्न पहाणे आले की नाही मला माहित नाही. कारण इंग्रजांसारख्या महासत्तेला आपण हाती काहीही शस्त्र न घेताना परत पाठवू ही संकल्पनाच मूळ स्वप्नाळू आहे आणि ते स्वप्न आपण आपल्या जीवनात फलद्रूप झाले आहे असे पहाणे त्याच्यामध्ये अहम भूमिका मांडणे हा जगामध्ये त्यांच्या आधी न झालेला प्रयोग आहे. मनुष्य जातीला याच्यानंतरही हाडा-मासाच्या गोळ्याकडून असल्या प्रकारचे मॅसेज मिळेल की नाही मी स्वत: साशंक आहे. तुम्ही आपले जीवनचरित्र सोडून भक्ती करा, तप करा, तपस्या करा हे सांगयला आपल्याकडे साधू, मुनी आणि विशेषकरून जैन धर्मामध्ये हे सांगणारे खूपच आहेत. परंतु या जीवनापासून लांब न जाता त्या जीवनाशी संघर्ष करून स्वत:च जे काही म्हणणे असेल ते लोकांपर्यत पोहोचवा हा संदेश मात्र साधूसंतांच्या पलिकडे जाऊन गांधीजींनी तुमच्या आमच्यासारख्यांना दिला आणि तसेच स्वत: जगले. असे काहीच बोलले नाही जे त्यांनी आधी केले नाही. तसे पाहिलं गेलं तर ते हुशार होते असेही म्हणता येत नाही. म्हणजे ३७ टक्यांवर मॅट्रीक पास झालेला हा महात्मा आणि तो लंडनला गेला कशासाठी? आपल्याला इथे या वर्गात बसून कॉलेजमध्ये काही समजतच नाही. म्हणजे आपल्याला अक्कलच नाही. आपण या विषयात कधी पासच होणार नाही म्हणजे ग्रॅज्युएशनच आपले होणार नाही याची खात्री झाली म्हणून कुठेतरी डिग्री मिळवायला पाहिजे, तर त्यांना जे दुसऱ्यांनी सांगितले, त्यांच्या चाहत्यांनी त्याच्यामधून त्यांचा बॅरिस्टर होण्याचा आणि तिथे जाण्याचा प्रसंग उभा राहिला. नाहीतर नसता राहिला. गांधीजींनी काय नाही केलं. सगळी व्यसने जवळून धुंडून पाहिली. परंतु ते सगळं करत असताना स्वत:च्या घडण्यासाठी त्याचा उपयोग केला. उपयोग करून जसे हंस दूध आणि पाणी वेगळे करतो तसे स्वत:च्या जीवनाला आणि स्वत:ला समाजाशी खूप जोडले. त्याच्यातून तेवढेच वेगळे ठेवले. अगदी वेगळे ठेवले. म्हणजे ज्यावेळेला गेले त्यावेळेला त्यांच्याकडे रामाशिवाय दुसरे काहीच नव्हते.

दुसरे मला जे वाटत आहे ते असे की, गांधीजींनी जैनीझमची आहे तशीची तशी काही बदल न करता तत्त्व जे आगामामध्ये लिहिलेले आहे, जी निश्चितच गांधीजींच्या आधी आहेत आगमचा पिरेड २५०० वर्षाचा. असे असताना म्हणजे सत्य, अहिंसा, अपरिग्रह, ब्रह्मचार्य आणि अस्तेय अनेकात सिद्धांत ही सगळी अगदी हुबेहूब जैनीझममध्येच आहेत, इतर धर्मांमध्ये अन्वयाने, अर्थाने ती आलेली असतील, परंतु या भाषेमध्ये किंवा शा शब्दांमध्ये ती आलेली नाहीत. सत्य तर सगळ्याच ठिकाणी आहे, अहिंसा कमी अधिक प्रमाणात आहे. ती सगळी जैन धर्मांची आहेत. तरीही गांधीजींनी किंवा जैन धर्मावर माझा विश्वास आहे किंवा जैन धर्माचा माझ्या आयुष्यावर फार मोठा प्रभाव पडलेला आहे असे कुठे म्हटलेले नाही असे का? हा प्रश्न

मला अजून अनुत्तरीत आहे आणि त्याच्यावर मी स्वत: रिसर्च करणार आहे.

कारण ज्यावेळेला गांधीजी म्हणतात की, 'माझ्या वडिलांच्या डोळ्यातून दोन अश्रू ज्यावेळेला मी त्यांना ते कन्फेशनचं पत्र दिले. माझ्या सगळ्या चुका मी त्याच्यात मांडल्या आणि तुम्ही मला शिक्षा द्यावी अशी शिक्षेची भिक्षा त्यांच्याकडून मागितली त्या दिवशी मी अहिंसेचा परमोच्च बिंदू पाहिला आणि साधला असे गांधीजी म्हणतात.

आता ही जी अहिंसेची ग्रेड त्यांनी दाखविली की तुम्ही चुक केलेली आहे, तुम्हाला पश्चाताप झालेला आहे. तुम्ही वडील आहात. परंतु बघ तुला मी शिक्षा नाही करणार. मी स्वत:लाच शिक्षा करून घेणार आहे आणि ते स्वत: रडले. त्यांनी काही केले नाही. त्या रडण्यामधून त्यांनी जे काही साधले ते मारण्यावरून साधले नसते आणि म्हणून अहिंसेची ही एवढी डेफिनेशन दुसऱ्याच्या मनाला आपण कोणत्याही प्रकारे त्रास देता कामा नये. आपण त्याचे प्रायश्चित्त घ्यावे ही जी गांधीजींनी पुढे चालविलेली परंपरा होती त्याचा जन्म या घटनेमध्ये होता.

आपल्याला जो पश्चाताप होतो तसे त्यांनी केले. पुढे दोन वेळा केले आणि त्याच्यानंतर त्यांनी तो आपल्या जीवनाचाच भाग करून घेतला. इंग्रजांनी सुद्धा त्यांच्यावर अन्याय केले, तरी ते इंग्रजांनी केलेले नाहीत ते इंग्रजांनी केलेल्या कायद्यांनी केलेले आहेत तेव्हा कायद्याचा भंग मी करतो आहे तर मला शिक्षा भोगलीच पाहिजे, मी इंग्रजांना वाईट म्हणणार नाही ही जी काही भावना आहे, हे जे काही अहिंसेचे स्वरूप त्यांनी पुढे ठेवले त्याचाही जन्म तिथेच होता. पण अहिंसेचा याच्याही पेक्षा जास्त सुक्ष्म असा विषय आणि विचार जैनीझममध्ये मांडलेला आहे.

आपल्या मनात काही चुकीची गोष्ट आली तर आपण पश्चातापाला पात्र आहोत अशी भूमिका जैन धर्माने अगदी सुरूवातीपासून मांडली आणि तिच भूमिका गांधीजींनी मांडली. त्याचे आचरण केले.

प्रत्येक ठिकाणी त्यांनी जैन धर्माचा उल्लेख केलेला आहे. अगदी सुरूवातीपासून म्हणजे ज्यावेळेला ते लंडनला जायला निघाले त्यावेळेला तीन शपथा त्यांनी घेतल्या किंवा आईने घ्यायला लावली ती कोणाकडून घेतली? जैन साधू कडून घेतली, नाही का ?

१९ दिवस मुंबईमध्ये चोमासामध्ये राहून त्यांना आपण बेराणो म्हणजे...

अन्नधान्य जेवणासाठी वगैरे वाढतो तर ते जे काम आहे ते गांधीजींनी त्यांना स्वत:च्या हातांनी वाढलं. आणि १९ दिवस हे ते करत राहिले.कारण काय होतं? त्यांची आई तसं करीत होती. चोमासामध्ये त्यांच्या आईनी काही खायच नाही, सूर्य दिसत नसला तर उपाशी राहायचं.

हे सगळं कुठून आलं ? कोणत्या धर्मात हे आहे हे दाखवा. चोमासा ही कन्सेप्ट कुठे आहे हे दाखवा. त्यांच्या आईवर जैन धर्माचा फार मोठा प्रभाव होता. त्यावेळेला गुजरातमध्ये होता हे गांधीजी लिहितात.

तर हे सगळं त्यांनी लिहिलेले असले तरी स्पष्टपणे कुठे लिहिलं नाही यांच कारण मला जे वाटत आहे मी जे शोधलं आहे. ते म्हणजे जर असं काही एक लेबल स्वत:ला लावून घेतलं असत तर मनुष्य जातीची सेवा करण्यामध्ये त्यांना कुठेतरी आडकाठी निर्माण झाली असती.

ते राईटच आहे.एक माझा स्वत:चा जो विचार आहे मी तुम्हाला सांगतो. आज ते इथे करतो आहे मी शुद्ध त्यांच्या जीवनीकडचे वळतो आहे. त्याच्यामधून मी तुम्हाला ही सगळी उदाहरणे सांगितली.

प्रश्न– आम्ही याची संगती अशी लावतो की ज्या पद्धतीने आपण सांगितलं की जैनीझमचा शिक्का, सगळं जैनीझमचं त्यांच्या आयुष्यामध्ये त्यांनी पालन केलं असतांना शिक्का मात्र त्यांनी लावून घेतला नाही. त्याची कारणही आपण सांगितली. ते सगळं आपल्या आयुष्यामध्ये...आले का? तो गांधींचाच प्रभाव मानावा का ?

उत्तर–निश्चितच तो प्रभाव आहे कारण मलाही ते माप, तो शिक्का नको आहे.

मी अनुभूती नाव दिले शाळेला, ''भवरलाल जैन'' किंवा ''कांताबाई'',''कांताई'' असं देऊ शकलो असतो, माझ्या या ऑफिसला नाव 'कांताई' आहे. मला जर द्यायचे असतं तर मी हे देऊ शकलो असतो. पण तिथे हा संकुचित विचार नको आहे. जरी तो करेक्ट असला तरी तो संकुचित होतो कारण ज्याला सर्वधर्मसमभाव ठेवायचा आहे त्यांनी आपल्या एका धर्माचा शिक्का लावायला नकोच आणि

सर्वसाधारणपणे सामाजिक काम करत असताना, सामाजिक जीवनामध्ये काम करत असताना आपण धर्म उंबरठयाच्या पलिकडे घेऊन जाऊच नसे. या मताशी मी पूर्णपणे सहमत आहे.

प्रश्न- धर्म म्हणजे तुमच असं म्हणणं आहे का की धर्मातले कर्मकांडे घेऊन जावू नये.

उत्तर - त्याच्याबद्दल स्वत:ला एक जो अभिमान असतो तो ही आपण तिथे सोडून जावा. बाहेर नेण्याचे काही कारण नाही.

तुम्हाला जेवढ्या म्हणजे प्रकर्षाने ते फील होते आहे तेवढा दुसऱ्यांनाही होत आहे. त्याच्यामुळे त्या भावना आपण दुखवता कामा नये. आणि म्हणून माझ्या कोणत्याही कामामध्ये किंवा उपक्रमामध्ये तुम्हाला धर्म हा विषय नाही आढळणार. माझ्या भाषणामध्येही तुम्हाला कुठे ही नाही आढळणार. माझ्या आचरणात तुम्ही बघू शकाल पण भाषणात नाही. त्याचे कारण हे आहे की भाषण म्हटलं की ते परिवर्तन करण्यासाठी आपण सांगतो आहे असा त्याचा अर्थ होतो.

त्याचा जो काही उगम आहे तो या विचारात आहे. या विचाराने मीही प्रभावित आहे की आपल्याला हे करता येईल का ? की अन्यायी माणसाशी प्रेम करावं आणि अन्यायाचा विरोध करावा. ही जी त्यांनी भूमिका मांडली तशी मांसाहारी माणसावर प्रेम करा पण मांसाहाराचा विरोध करा हे शक्य आहे का? आपण पाळण्याचा प्रयत्न करतो. आपण किती त्याच्यात यशस्वी होऊ की नाही सांगता येत नाही. परंतु पाळण्याचा प्रयत्न करतो. मला असं वाटते की या थोड्याफार बाबी वर मी आपल्याशी चर्चा केली, त्या ज्या व्यक्तीच्या जीवनाकडे बघून एवढं काही आपण शिकलो असेल त्याची परतफेड आणि समाजाच्या, कालच्या समाजाच्या, आजच्या समाजाच्या आणि उद्याच्या समाजाची मुलभूत वैचारिक भूक पूर्ण करण्यासाठी 'गांधी रिसर्च फाऊंडेशन'चा जन्म आहे.

प्रश्न- आपल्या काळात खान्देशात खासकरुन साने गुरुजींचा फार प्रभाव होता. गांधीजींच्या करुणेचे ते मूर्तिमंत उदाहरण होते. त्यांच्या त्या विचारांचा स्पर्शही आपल्या जीवनास झालेला आहे. काय ? इझम मधून बाहेर पडून विश्वस्वरुप बघण्याच्या मनोवृत्तीवर गुरुजींचा प्रभाव आहे काय.

उत्तर- बघा ! एक गोष्ट स्पष्ट आहे की गांधीजी गेले तेव्हा मी फक्त अकरा वर्षांचा होतो. त्या वयात एवढी समज नव्हती. तेच गुरूजींच्या बाबत घडले. परंतु पुढे श्यामच्या आईचा माझ्यावर विलक्षण प्रभाव पडला. माझ्या जीवनातल्या पुस्तकांपैकी एक पुस्तक श्यामची आई आहे. ते अहिंसेचेच एक रुप आहे.

.मुळात प्रश्न असा आहे की 'श्यामची आई' आई सुद्धा रडली कारण मीठ टाकलेलं नव्हतं परंतु मुलाने नाही सांगितलं ही अहिंसेची उंची आहे. म्हणजे जी गांधीजींची झाली कन्फेशन लेटरमध्ये हीच स्थिती आहे. पण हा विचार आज माझ्या मनात येतो आहे. त्यावेळेची माझ्या मनाला भावलेली ती आई आजही स्पष्ट दिसते आहे. हा बसलेला श्यामही आहे. स्पष्ट दिसतो आहे. गांधीजींनी एक-दोन ठिकाणी म्हटलं आहे ते सत्य आहे. की काही घटना श्रावण बाळाच्या किंवा हरिषचंद्राच्या त्यांच्या डोक्यावर तशा बिंबीत झालेल्या आहेत. माझ्याही डोक्यावर 'श्यामच्या आई'चा तसा प्रभाव पडलेला आहे.

मला फक्त एवढंच दिसत आहे की त्यावेळेची जी 'शामची आई' आणि तो शाम, हे दोनच मला दिसता आहेत आणि त्यांच्यामध्ये असलेलं कम्पॅशन. साने गुरूजीचे कम्पॅशन म्हणजे काय ती आईच होती. स्वत:च आई होती म्हणजे शामची आई हा विषय नंतरचा आहे पण ते स्वत:च आई होते ना ? त्याचाच पुढे त्यांनी विकास समाजकार्यांमध्ये केला, तिच वृत्ती त्यांनी समाजामध्ये खोल राबविली. आणि त्याच वृत्तीमुळे त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

तर मला असं वाटत की गांधीजी , साने गुरुजी, विनोबाजी या विभुती सगळ्या एकमेकांना मिसळलेल्या आहेत. कोणाकडून शिकलेला हा विषयच नाही. विषय फक्त एवढाच आहे की आपण जे काही शिकलो ते प्रामाणिकपणे समाजापुढे ठेऊन अहिंसक मार्गाने त्यांनी तो लढा यशस्वीरित्या पार पाडला. अशा माणसाची स्मृती आपण जर चिरंतन करणार नसू तर आपण स्वत: जीवनामध्ये येऊन फार मोठमोठी कामं केलेली असली तरी ती अपूर्ण पडतात. जीवन पूर्ण होत नाही. जीवन पूर्ण करायचे असेल तर तुम्हाला समाजाची

ही परतफेड करायला पाहिजे. आपण वडिलांची करतो, आईची करतो आपल्याशी ज्याचे संबंध आले त्यांची करतो पण ज्यांचा प्रभाव आपल्यावर झाला त्यांची करायला बऱ्याचवेळा विसरतो. कारण ते समोर दिसत नाही आणि म्हणून ते विसरतो. मला असे वाटते की ईश्वकृपेने मला ही सद्बुद्धी झाली. ती सत्तरीत आली काय किंवा पंचाहत्तरीत आली काय हा काही खास महत्त्वाचा मुद्दा आहे असं वाटत नाही. पण सुरुवातीपासून जर आपण अभ्यास करत आलो तर ते तर मला माझ्या अनुवंशिकतेतून मिळालेलं आहे.

प्रश्न-भाऊ, आम्हाला आणखी एक म्हणायचं आहे ते म्हणजे तुम्हाला मिळालं तुम्ही असं बोलला पण त्यात आणखी असा प्रश्न उभा राहतो की मग असे मिळालेले उद्योगपती अनेक आहेत. जैन उद्योगपती आहेत. जगाच्या पाठीवर अनेक असतील त्यांनाही असंच तुमच्यसारखेच मिळालेले आहे जन्माने. पण मग तुम्हीच फक्त गांधीकडे इतके सखोल गेलात तर याचा दुसरा अर्थ असा होतो की तुमची ती आतली भूक आहे का ?

उत्तर-असू शकेल. मी आहे म्हणून हे करतो आहे अशाप्रकारचा विचार माझ्या मनात नाही आहे. मला एक नक्की वाटत की सामाजिक ऋण आहे याची परतफेड करणं बरीच माणसं आपल्यापैकी विसरतात जैनच कशाला इतरही समाजामध्ये कोण करतं? एखादं मंदिर बांधायचे असेल तर कुठेतरी आपण मदत करतो आणि त्याच्यातही दोन नंबरचे पैसे लावतो. म्हणजे पांढरा दगड, म्हणजे मार्बल घेण्यासाठी आपण काळे पैसे लावतो. आणि मंदिर बांधल्याचे खूप समाधान आपल्याला होतं. मी गांधीजींच मंदीर बांधलेलं नाही त्याच्यापलिकडे जाऊन, ज्यांच्यासाठी मंदिर निर्माण केली जातात ते केलं आहे. आणि ते ५,१० वर्षांसाठी केलेलं नाही, शेकडो वर्षांसाठी ते रहावे अशा पद्धतीने ते उभं केलं आहे यांच मला समाधान आहे, मोठं समाधान आहे.

*मुलाखकार- रमेश दाणे,*
*संपादक, साम्ययोग साधना*
*४५, प्रमोद नगर, सेक्टर-३*
*नकाणे रस्ता, देवपूर, धुळे-४२४००२*

## ग्रामस्वावलंबन एकमेव पर्याय डॉ. गंगाप्रसाद अग्रवाल यांचे प्रतिपादन

देश घडविण्यासाठी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी नमूद केलेल्या एकमेव 'ग्राम स्वावलंबनाचा',मार्ग अवलंबिण्याची गरज असल्याचे उद्‌गार ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक तथा सर्वोदयी विचारवंत डॉ.गंगाप्रसाद अग्रवाल यांनी मानवत येथे बोलतांना व्यक्त केले. विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली पुरस्कृत के. के. एम. महाविद्यालयात गांधी अध्ययन केंद्राच्या वतीने आयोजित दोन दिवशीय निवासी सर्वोदयी युवक प्रबोधन शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष विजयकुमार कत्रुवार, प्रा. शेखर सोनाळकर (जळगाव)सर्वोदयी कार्यकर्ते, विशाल अग्रवाल, जयकुमार काला,डॉ. डी. बी. लड्ढा, प्राचार्य डॉ.ए. बी. चिंदुरवार यांची याप्रसंगी उपस्थिती होती. पुढे बोलतांना स्वातंत्र्यसैनिक अग्रवाल म्हणाले की, संगणकाच्या युगात जग बदलले आहे. जगात प्रामुख्याने अमेरिका-युरोप या राष्ट्रांना उतरती कळा लागली आहे. तब्बल ८४ बँका बुडाल्याने ३०००० कर्मचाऱ्यांवर बेकारीची नामुष्की निर्माण झाली आहे. यातून सावरण्याची क्षमता केवळ गांधीजींच्या विचारात असून संयमित जीवनशैली स्वीकारण्याचा पर्याय उपलब्ध असल्याचे स्वातंत्र्य सैनिक अग्रवाल यांनी सांगितले. मराठवाड्यातील तरुणांनी विकासाचा अनुशेष पूर्ण करण्यासाठी आंदोलनाची पुनरावृत्ती करण्याचे आवाहन त्यांनी केले. शिबिरात हिंगोली, परभणी जिल्हयातील विविध महाविद्यालयाच्या ७० विद्यार्थी-विद्यार्थिनींचा समावेश होता. प्रारंभी राष्ट्र सेवा दलाचे विश्वस्त व माजी खासदार डॉ. बापूसाहेब काळदाते यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. सर्वोदय विचार-एक दृष्टिक्षेप' या पुस्तिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. माजी प्राचार्य डॉ. ओ. बी. समदाणी, ज्ञानेश्वर मुंडे, सखाराम पवार, आर. डी. कुलकर्णी आदींची उपस्थिती होती. 'वैष्णव जन तो तेणे कहीए' या गांधीजींच्या प्रिय भजनाचे गायन डॉ. एम.एन. काळे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. बी. एल. गोंगे यांनी तर डॉ. शारदा राऊत यांनी आभार प्रदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. ए. बी. चिंदुरवार यांनी केले. प्रथम सत्रात प्रा. शेखर सोनाळकर यांनी 'गांधी हत्या काय खरे काय खोटे' या विषयावर मार्गदर्शन केले तर दुसऱ्या सत्रामध्ये विशाल अग्रवाल यांनी महात्मा गांधीजींच्या विधायक कार्यक्रमात तरूण-तरुणींची भूमिका या विषयावर प्रबोधन केले.

*- शुभदा*
*(वसमत) जि. हिंगोली.*

मुलाखत

# म. गांधीजींच्या विचारांचा संदेश आगामी पिढ्यांपर्यंत नेण्यात कसलीही कसूर करणार नाही- अशोक जैन यांचे मनोगत

**गांधीजींचा ट्रस्टीशिपचा विचार आम्ही तंतोतंत आमच्या परिवारात अंमलात आणलेला आहे. त्यासाठी भाऊंनी आम्हाला काही सांगितले नाही किंवा आमच्यावर दबाव आणला नाही. गांधीर्जींच्या जीवनविषयक तत्त्वज्ञानाचा संस्कार आम्हाला घरातच भाऊंकडून कृतीतून बघायला मिळाला. परिणामी आम्ही स्वत:हूनच त्यांना ट्रस्ट करायला सूचविले. या प्रस्तावाचा त्यांना अपार आनंद झाला. त्यातून आम्हाला जे समाधान मिळाले, त्याचे वर्णन शब्दात करता येणे अशक्य आहे. आम्हा चारही भावंडांमध्ये कोणी एक भवरलालजी नाही. आम्ही चारही मिळून भवरलालजी आहोत. कारण भवरलालजी सारखी एखादी व्यक्ती करोडमधून एखादीच निर्माण होते. अशा शब्दात पद्मश्री भवरलाल भाऊंच्या एकूण जीवन प्रवासाबद्दलचे भावोद्गार गांधी रिसर्च फाऊंडेशनचे विश्वस्त अशोक भाऊ जैन यांनी सदर मुलाखतीतून व्यक्त केले आहेत. अनेकांना ही मुलाखत प्रेरणादायी ठरेल.**

**– संपादक**

प्रश्न : माझा असा प्रश्न आहे की जेव्हा संपूर्ण औद्योगिक जगत गांधी विचारांच्या उलट्या प्रवाहाच्या दिशेने जात असतांना देशातल्या एका मोठ्या उद्योग साम्राज्याचा संस्थापक गांधींना प्रस्थापित करण्यात गुंतले आहेत ते आपले पिता आहेत. पूत्र या नात्याने आपण आमच्या वडिलांच्या या कार्याकडे कशा पद्धतीने बघता आहात.

निवेदन : आपण प्रश्न उपस्थित केला आहे की भारतातील जे उद्योगपती आहेत त्या उद्योगपतींना गांधीर्जींच्या विचारांबद्दल आस्था दिसून येत नाही अशाच वेळेला जळगावला भवरलालजींनी, म्हणजे माझ्या वडिलांनी गांधी विचार जगभर नेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. त्यांच्याबद्दल माझी जी भूमिका त्यांचा मुलगा म्हणून आहे ती अशी आहे की, महात्मा गांधींचा विचार वडिलांनी नुसता वाचला असे नव्हे तर त्यांच्या विचाराने जगण्याचा थोडाफार प्रयत्न त्यांच्या उमेदीच्या काळात सुरू केला. त्यांच्यावर महात्मा गांधींच्या विचारांचा एक पगडा होता त्या पगड्यामुळे १९६३ पासून त्यांनी जो व्यवसाय सुरू केला त्याच्यात त्याचे एक प्रतिबिंब येते.

माझा जन्म झाला आणि त्यांनी काम सुरू केले. ते मी स्वत: बघितले नाही. परंतु त्यांच्या किंवा त्यांच्यासोबत ज्या लोकांनी काम केलं त्यांच्या तोंडून जेव्हा ऐकतो तेव्हा गांधीजींचे जे काही विचार होते त्या विचारानुसार त्यांनी व्यवसाय करायचा प्रयत्न केला. त्या काळी केरोसिनचा खूप तुटवडा असायचा आणि ब्लॅक मार्केट खूप होते. परंतु त्यांनी ब्लॅक मार्केट न करता जेवढा त्यांच्याकडे साठा उपलब्ध असे. त्या साठ्यातून प्रत्येकाला एक लिटर तरी देता आले पाहिजे. अशी व्यवस्था केली. बियाण्यांमध्ये शॉर्टेज असायचा, कपाशीचे जे एक्सपोर्ट बियाणे होते. – 'वरलक्ष्मी' होती त्या वेळेला त्याचा अनुभव तर मी स्वत: घेतला. जेव्हा मी शाळेत शिकत होतो. उन्हाळ्याच्या सुटीत गावातल्या दुकानात जाऊन बसायचो आणि त्या वेळेला शेतकरी यायचे बियाणे घ्यायला आणि आम्ही ट्रेनिंग म्हणून काऊंटरवर बसून बिलं फाडायचो. शेतकऱ्यांना माहिती नाही की मी भाऊंचा मुलगा आहे. त्याच्यामुळे ते म्हणायचे अरे भो १० रु. जादा घे. पण मला एक थैली जास्त दे. परंतु तिथे आमचे ठरलेलं होतं की प्रत्येकाला दोनच थैल्या द्यायच्या. तर त्यांच्यावर हा सगळा जो प्रभाव होता तो गांधीजींच्या विचारांचाच होता. त्यामुळे भाऊंनी हा विषय वयाच्या पंचाहत्तरीमध्ये जगापुढे नेण्याचा प्रयत्न सुरू केला. एक काळ होता, त्यावेळेला गांधीजींनी तो विषय मांडला आणि गांधीजींनी जे भारतात केले त्याचे परिणाम जगभर पडले हे सगळ्यांना माहिती आहे. कित्येक देशनंतर गांधीर्जींचे विचार घेऊन स्वतंत्र झालेले आहे. परंतु गेल्या ६० वर्षात गांधीजींच्या विचार आणि आचार ह्या दोघांची त्यांच्या जन्मभूमीपासून, त्यांच्या कर्मभूमीपर्यंत अवहेलना सुरू आहे. कुठेतरी परत जगाला हा संदेश आणि त्यातल्या त्यात भारतीयांना तो देण्याचा प्रयत्न करावा म्हणून भाऊंनी हे कार्य सुरू केलेले आहे. मला असे वाटते की ते काम योग्य व राईट टाईम होत आहे. त्याचा ईम्पॅक्ट लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत नक्कीच होणार आहे.

परत थोडेसे आमच्या फॅमिलीकडे जातो की, त्यांच्यावर गांधीजींच्या विचारांचा असलेला पगडा, त्यामुळे आमच्यावर काम करतांना प्रभाव पडला. आता मलाही काम करतांना ३० वर्ष झाली आहेत त्यांच्यासोबत. मी आता पन्नाशीत शिरतो आहे. त्यांच्यासोबत काम करताना पावलो पावली आम्ही अनुभव घेतलेला आहे. परंतु आता त्यांचा नातू म्हणजे माझा मुलगा वय वर्ष फक्त ८ आहे त्यांच्यावरही त्याचा किती ईम्पॅक्ट आहे हे एक छोटेसे मी उदाहरण आपल्यासमोर मांडतो. १०-११ दिवसापूर्वीची गोष्ट आहे तो भाऊंशी चर्चा करत होता. तो डिस्कशन करत राहतो असे वेगवेगळे प्रश्न विचारतो. तर त्यांने सांगितले की भाऊ, दादा तुम्हारा बर्थडे आ रहा है, १२ तारीख को तो मुझे तुमको कुछ गिफ्ट देना है । तर दादांनी त्याला सांगितले की मै तेरे से गिफ्ट नही लुंगा क्योकि तू रिटर्न गिफ्ट मांगेगा । कारण की आजची ती संस्कृती आहे रिटर्न गिफ्टची, तो मुझे ये गिफ्ट संस्कृती पसंद नही है तो मै लूंगा भी नही और तेरे को दुंगा भी नही । तो उसने ऐसा जबाब दिया की दादा मुझे रिटर्न गिफ्ट की जरूरी नही है । तुमने हमको बहोत बडा रिटर्न गिफ्ट दे दिया है । तर दादांनाही आश्चर्य वाटलें की हा काय म्हणतो ? तर दादांनी विचारलं मी काय तुला रिटर्न गिफ्ट दिले ? तो म्हणाला आपने हमे सब ग्रँड चिल्ड्रन के लिए अनुभूती स्कूल बना दी है, वो हमारा रिटर्न गिफ्ट हो गया । तो मुझे कोई रिटर्न गिफ्ट नही होना, और मै आपको क्लू देता हू तो आप मेरेको बताओ की हम तुमको क्या देनेवाले ? त्यांनी क्लू दिलेला आहे, आज तारीख ४ आहे डिसेंबर. परंतु अजून भाऊंना समजलेलं नाही की तो काय देणार आहे. परंतु त्याने दुसऱ्या दिवशी सकाळी ही घटना, सकाळी तो माझ्या बरोबर फिरायला येतो. ५.३० वाजता तर त्याने ही घटना मला सांगितली. तो मला हे म्हणाला, की दादा को गिफ्ट देना है और वो गिफ्ट मेरेको गांधीजी का स्टॅच्यू देना है । वय वर्ष ८ परंतु त्यांच्यावर भाऊंचे जे काही काम चालू आहे. तो दर रविवारी त्यांच्यावरोबर गांधी रिसर्च फाऊंडेशनच्या साईटवर जातो. तिथले काम काय चालू आहे. भाऊ काय बोलतात. ते काय चर्चा करतात तो ते ऐकत असतो आणि त्याला हे सगळं समजत. तर त्याच्यावर आता तो ईम्पॅक्ट चालू आहे. तर त्याच्या मनात आले की, दादाजी को गांधीजी का स्टॅच्यू देना है आणि तो माझ्या मागे लागला की मेरेको कोई भी हालत में स्टॅच्यू देना है । मी विचारले -कौनसा देना है ? खडा तो दादाने लगाया है बच्चों के साथ का और एक युनिवर्सिटी में बैठा हुआ है लगाया है । वो चरखावाला बनाओ चरखे के साथवाला दादा को देंगे । तर आता मी तो स्टॅच्यू तयार करतो आहे आणि १२ तारखेला सगळ्या ग्रँड चिल्ड्रेन तर्फे त्यांना तो स्टॅच्यू देणार आहे. म्हणजे घरात भाऊंपासून आता आमच्यामध्ये तर ते उतरलेलेच होते. पुढच्या पिढीतही तयार होत आहे.

यंग जनरेशनवर जर आपण हा फोकस ठेवला तर खूप मोठ्या प्रमाणावर गांधी विचार भारतामध्ये रूजू शकतील. काम खूप करावे लागणार आहे. आणि जे काही आपल्याकडे गांधीयन्स आहेत आजच्या तारखेत. भारताच्या आपल्या या भूमीवर काश्मीरपासून कन्याकुमारी पर्यंत जे काही गांधीयन्स आहेत त्यांच्या विचारांचा फायदा करून आजच्या यंग जनरेशनपर्यंत ते पोहचविण्याचे कार्य या सेंटर पासून व्हायला पाहिजे अशी अपेक्षा आहे.नाव करायचे आहे किंवा पैसे आहेत म्हणून करायचे आहे असे मुळीच नाही.

उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या पहिल्या पदवीदान समारंभामध्ये १९९२ साली ते हजर होते त्यावेळेला मा. न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी साहेबांच्या उपस्थितीत पदवीदान समारंभ होता. त्यांच्या भाषणात त्यांनी गांधीजी हा विषय मांडला तर वडिलांवर आधीपासून तो प्रभाव होता. परंतु त्यांच्यामुळे खूप जास्त झाला त्यांची कोणतीही ओळख न्यायमूर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी साहेबांबरोबर नसतांना जिथे उतरले होते ति थे जाऊन दुपारी भेटले आणि त्यांना सांगितले की माझी इच्छा आहे की, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाला १५ लाख रू. देऊन गांधी चेअर हा विषय चालू करावा ही सुरुवात झाली. परंतु नेहमी प्रमाणे लाल फितीत तो विषय अडकला. २००७ वर्ष उजाडले. तेथे काहीतरी करण्याचा प्रयत्न केला. आम्ही तिथे एक चांगला पुतळा उभा केला कामही सुरू केलं. परंतु तरीही सरकारची परवानगी न आल्यामुळे तिथून आपल्याला तो प्रोजेक्ट उचलावा लागला, गुंडाळावा लागला. आणि शेवटी आपण आता तो जैन हिल्सला सुरू केला. म्हणजे आपण विचार

करा - १९९२ ला आलेला एक छोटासा विचार. छोटासा म्हणजे बीज म्हणा. आपण परंतु त्याला मूर्त स्वरूप यायला २०११ उजाडेल किंवा २०१२ लागेल. त्यावर आता १५ लाखाऐवजी १५ कोटी खर्च होणार आहेत. परंतु आज जगाच्या पाठीवर या प्रकारचे सेंटर आजपर्यंत नाही आहे. पुढे दुसरेही लोक करू शकतील. केले तर आम्हालाही आनंद आहे की कमीत कमी कुठेतरी आपण सुरूवात केली आणि ते बघून अजून ५० ठिकाणी झाले तर ते विचार हजारो, लाखो, कोट्यावधी लोकांपर्यंत पोहचवू आपण. आमच्याबरोबर भाऊंची कित्येकवेळा चर्चा झाली आणि त्यामुळे आजचे स्वरूप त्याला आलेले आहे, विविध वस्तू ग्रंथालय व हस्तलिखिते, तिकिटे त्यात असतील. हे तर झाले चित्र, वस्तूबाबत. परंतु आयुष्यात किंवा रोजच्या जीवनामध्ये आपण त्याचा काय उपयोग करून घेतो आहे किंवा आमच्या बिजनेसमध्ये आम्ही काय करून घेतो आहे. किंवा आमची जी सोशल कमिटमेंट आहे. त्यात कसा गांधी विचारांचा. आणि सोशल ॲक्टीव्हीटीजचा मेळ घालण्याचा प्रयत्न करतो आहे. हे महत्त्वाचे आहे. स्वत: जैन असल्यामुळे अहिंसा हा विषय रक्तातच आहे. म्हणजे आमच्या रक्तातच असल्यामुळे तो एक बेनीफीट आहे. म्हणजे गांधी विचारांकडे आकर्षित होण्यासाठी जी काही आपल्या विचारांमध्ये गरज असते ती तिथून सुरूवात झालेली होती. भगवान महावीरांची ती शिकवण आहे. त्यांनी मोल्ड करून लोकांसमोर मांडली. आत्ताच्या काळात परत त्या विचारांना बेस तोच ठेऊन आजच्या जगाला काय पाहिजे. त्यादृष्टीने लोकांपर्यंत नेण्याचा प्रयत्न करण्यासाठी सगळ्या नवीन टेक्नॉलॉजीचा वापर करून घ्यावा लागणार आहे आणि ते आपण करणार आहोत.

सोशल वर्क करतांना गांधीजी आणि गांधीजींचे विचार कसे त्या प्रत्येक प्रोजेक्टमध्ये येतील याचा आम्ही प्रयत्न करतो आहे. आणि ते भाऊंच्या मार्गदर्शनाने सगळे सुरू आहे. ते खूप पूढचा विचार करतात. जेव्हा त्यांना खात्री पटली की मी जे उभे करतो आहे किंवा करायचे आहे. ते पुढे माझ्याच परिवारातून कोणीतरी याला चालविणार आहे. ही खात्री पटली मी केलेले कार्य पुढेही अहोरात्र वर्षानुवर्षे चालू राहील. त्यांनी काही आमच्याशी त्यांच्याबद्दल चर्चा नाही केली. पण आमच्याशी बोलतांना. आमच्या वागण्यामध्ये, आमच्या कामामध्ये, आमच्या विचारांमध्ये त्यांनी हे सगळे बघितले तिसऱ्या पिढीमध्येही त्याचे प्रतिबिंब त्यांना दिसायला लागले. त्यामुळे त्यांनी एवढा मोठा निर्णय घेतला आणि हे काम सुरू केलेले आहे.

प्रश्न : मग मला एक प्रश्न या ठिकाणी पडतो तो हा की मोठे चिरंजीव म्हणून तुमच्याशी सगळ्या गोष्टी शेअर झाल्यात, तुमच्याशी बोलणे झाले हे सगळे ठिक आहे. परंतु शेवटी निसर्गनियमानुसार सगळ्या तुमच्या चौघा भावांमध्ये चार प्रवृत्ती असणार तर तुमच्या सगळ्या भावांचे पण या विषयीचे मत भाऊंनी जाणून घेतले आहे कां ? भावांचा यात सहभाग किती ?

उत्तर : असे आहे की, हे जे काही भाऊंनी उभे केले तिथे फक्त माझ्याशी एकट्याशी चर्चा होत राहिली असे नाही. चारही भाऊ यात आहेत. सगळ्यांशी चर्चा होऊनच हा निर्णय झालेला आहे. त्यांनी काय करायला पाहिजे आणि काय नाही करायला पाहिजे तो अधिकार वडिलांचा. त्यांनी आम्हाला विचारायची आवश्यकता नाही. कारण हे सगळे त्यांचे आहे. त्यांनी फाऊंडेशन केले आहे आपण इमारती त्याच्यावर चढवतो व्यवस्थित काम करतो आहे. तरीही विचारांची, चर्चेची प्रक्रिया त्यांनी यात वापरली हे महत्त्वाचे. इथे कामे वाटली गेलेली आहे.

अपरोक्ष मी इथे जळगावी असतो. त्यांच्या सामाजिक कार्य करायचा एक विषय आहे चारही भावांना वाटते की सगळ्यांनी केले पाहिजे परंतु व्यवसाय सुद्धा आहेच. तर सगळ्यांनी ते करणे शक्य नाही आहे. त्याच्यामुळे ती जबाबदारी माझ्यावर आलेली आहे. मोठा मुलगा म्हणून सुद्धा.

गांधीजींच्या विचारांचा पगडा होता.त्यामुळे आपोआपच ते जीन्स आमच्यामध्ये आलेले आहेत.

१९८५ ला एक लायसन्स पाहिजे होते. पीव्हीसी पाईप बनवण्यासाठी कच्चा माल लागतो. पीव्हीसी रिजीस बनवण्याचा कारखाना टाकायचा होता. जळगाव पासून दिल्लीपर्यंत आपली फाईल गेली. सगळा प्रोजेक्ट सँक्शन झाला. आणि शेवटी केंद्रीय मंत्र्याच्या टेबलावर ती फाईल गेली फायनल सहीला. तर त्याने वडिलांना बोलावलं. चर्चा

झाली. त्याने सगळं दाखवलं. सांगितलं की सँक्शन हो गया. त्याने त्यावेळेला ५ कोटी रुपयांची मागणी केली लायसन्स देण्यासाठी. वडिलांनी त्याला सांगितलं की मी मेरीटवर इथपर्यंत आलो आहे. तुम्ही लायसन्स देणार असाल तर मेरीटवरच लायसन्स पाहिजे. एक रुपया सुद्धा तुम्हाला देणार नाही. अर्थात आम्हाला ते लायसन्स मिळाले नाही.

सांगायचे तात्पर्य असे की जर त्या दिवशी वडिलांनी ते पाच कोटी दिले असते. आज आमचा उद्योग समुह ५ हजार कोटीवर आहे. आम्ही आज २५ हजार कोटी वर राहिलो असतो. आमच्याकडे आज १० टक्के जरी नफा पकडला तर अडीच हजार कोटी रुपये राहिले असते. त्या अडीच हजार कोटीतून आम्ही ५०० कोटी खर्च केले असते समाज उपयोगी कामासाठी परंतु आज अडीच शे कोटी रुपये नफा असून सुद्धा समाजासाठी जो काही पैसा आपण खर्च करतो आम्हाला त्याच्यात एक समाधान आहे. आत्मिक समाधान आहे.

प्रश्न- मला असे म्हणायचे आहे की, ह्या गोष्टी ज्या आहेत त्या तुम्ही जैन समाजामध्ये जन्माला आला म्हणून अपेक्षित आहेच. पण सगळेच जैन तसे नसतात. योगा योगाने तुमची फॅमिली जैन उद्योजक आहे.

उत्तर - भारतामध्ये दोन प्रकारे इंडस्ट्री चालते आज- एक रिलायन्सला फॉलो करणारे आणि एक टाटा ला फॉलो करणारी. आपण टाटा ला फॉलो करणारी लोक आहोत. रिलायन्सला फॉलो केले असते तर आज २५ ते ५० हजार कोटीवर पोहचलो असतो. आणि ८ हजार कोटीचे कुठेतरी घर बांधले असते.घर नाही बांधलं आणि आम्ही जळगांव ही नाही सोडले. कारण हेच आहे की बिजनेस करत असतांना नीती मूल्ये सोडून करण्याची गरज नाही. स्वत:च्या गरजा एवढ्या कमी ठेवा की तुम्हाला पैसा हा तुमच्या साठी कमवण्यापेक्षा तो कमवुन समाजाच्या उपयोगी टाकता आला पाहिजे. त्याच्यामुळेच ती भावना जी आमच्या घरात आहे ती काही कोणीही असं आम्हाला शाळेत शिकवतात तसं कोणी शिकवलेलं नाही. ते घराच्या वातावरणावरुन, भाऊंच्या वागण्यावरुन, बोलण्यावरुन, विचारावरुन, डिस्कशमधून ते येत गेले.

पैशावरुन भांडणं होतात, फॅमिली तुटते, भाऊ भाऊ वेगळे होतात. आम्ही चारही भाऊंनी भाऊंना सांगितल की आपली सगळी संपत्ती आपले सगळे शेअर तुम्ही ट्रस्ट करा त्याच्यात टाका. गोष्ट संपली. ज्याला काम करायच असेल तो करेल. ज्याला वाटत असेल की कामकरु नाही तर तो जायला मोकळा आहे त्याला काही मिळणार नाही कारण प्रॉपर्टी सगळी ट्रस्टची झालेली आहे. व्यक्तिगत शेअर अशोक जैनच्या नावावर ही नाही, अनिलच्या नावावर नाही, अजितच्या नावावर नाही आणि अतुलच्या नावावर नाही. ट्रस्टची प्रॉपर्टी. हे भाऊंना सांगितलं. तर त्याच्यामुळे वडील म्हणून त्यांना एक आनंद झाला की हा विषय मुलांकडून आलेला आहे. त्यांनी सांगितलं असत तर तेही आम्ही केलेच असते पण आमच्या तर्फे आल्यामुळे त्यांना एक वेगळे महत्व आलेलं आहे. या वृत्तीमुळे व कृतीमुळे

रात्री घरी गेल्यावर शांततेची झोप घेवू शकतो. ती सगळ्यांच्या नशिबी नाही कारण ते त्या पद्धतीने काम करतात म्हणून नशिबी नाही. आमचा तो विषयच नाही.कारण आपला बेस जो आहे काम करण्याचा तो गांधी विचारांचा अहिंसावादी आहे.

प्रश्न-मला तुम्हाला आणखी एक प्रश्न विचारायचा आहे की, जो स्वाभाविकपणे बहुतेक जैन असेल तर त्याला पडेल, तो असा आहे की, परंपरंगत जे जैन धर्म पाळतात आणि त्यातही अत्यंत स्वच्छतेने काम करणारी माणसे आहेत आणि काही रुढीग्रस्त पण आहेत. तुमचे जे बाबा आहेत दलुभाऊ ते रुढीग्रस्त नाहीत परंतु अतिशय सेवाभावी पद्धतीने ते करीत आहेत. त्यांना भाऊंच्या कामाचे भयंकर अप्रुप आहे. तर अशा वेळेला तुम्ही परंपरागत जे रुढीग्रस्त जैन लोकं आहेत त्यांच्याकडे बघतांना तुमच्या मनात काय भावना येतात?

उत्तर- कसं आहे, रुढीग्रस्त जैन लोकं बघण्यामध्ये येतात, चर्चेमध्ये येतात त्याबद्दल आमचं असं मत आहे...की धर्म जैन धर्म किंवा कोणत्याही धर्माचे कशा पद्धतीने आपण आचरण करतो हे महत्वाचे आहे. मंदिरात जाऊन रोज बसलो, त्या स्थानकामध्ये रोज जाऊन दोन तास बसून राहिलो किंवा सगळ्या गुरुदेवांजवळ रोज जाऊन बसलो किंवा त्यांना भेटत राहिलो भारतभर त्यांच्यासाठी जात राहिलो तरच तुम्ही धर्मात्मा होऊ शकता किंवा धर्म

आचरणात आणता असे नाही. आम्हाला असे वाटते की, कोणत्याही गोष्टीचा अतिरेक होऊ नये स्थानकामध्ये जाऊन बसतात ते तिथून एक तासानंतर उठतात आणि नंतर जाऊन काय करतात आपल्याला माहिती आहे. दोन नंबरचा धंदा करणार, हे करणार, ते करणार, घरात जावून भांडण करणार, भावा-भावाचे पटणार नाही, तिथे जाऊन ते विचार ऐकणार ते विचार ऐकून बाहेर पडल्यावर ते आचरणात आणले पाहिजे. लोक आचरणात २ टक्केही आणत नाहीत. मग आम्ही तिथे जात नाही परंतु आम्ही ते रोज आचरणात आणत असतो तर लोकांना असे वाटते की आम्ही स्थानकमध्ये नाही गेलो म्हणजे आम्ही नास्तिक आहोत. तर आम्हाला ही तेवढाच आदर आहे जेवढा तिथे रोज जाऊन बसणाऱ्यांना असतो. मी माझ्या कंपनीच्या प्रत्येक लेटरहेडवर किंवा माझ्या कार्डसवर Live & Let Live असा महावीर भगवानचा संदेश लिहिला आहे, 'जगा आणि जगु द्या' हे तत्व मी जगभर पाठवण्याचा प्रयत्न करतो. तर मी ते आचरणात आणतोच आहे ना 'जगा आणि जगु द्या'. परंतु मी जे करतो आहे ते मी अजून जगभर पोहोचवलं आणि ते वाचून १० लोकंही ते करायला लागले तरी आमच्यासाठी ते भरपूर आहे. म्हणून मग हे स्थानकामध्ये जाऊन बसलो म्हणजेच मी धर्म करतो असे नाही.

त्याच्याकडे भाऊंनी कधी लक्ष दिले नाही आम्हीही दिले नाही. आम्ही जो आला त्याला मदत करायचा प्रयत्न केला. भरपूर ठिकाणी स्थानके उभी राहिली त्याच्यात फुल न फुलाची पाकळी म्हणून सहकार्य करणे शक्य ते आम्ही केलं. मंदिरांनाही केलं त्यासोबत मज्जीदलाही केले. ख्रिश्चन लोकांना केले सगळ्यांना केले. लोकांचा आमच्यावर हा पण आरोप आहे की आम्ही जैन समाजासाठी काही करत नाही दुसऱ्यांसाठीच करतो. तिथे भाऊंच हे म्हणणं आहे की मी एका समाजाचा नाही. मी सगळ्या समाजांचे प्रतिनिधीत्व करणारा माणूस आहे.

ॲटोमेटीक ते गांधीजींच्या विचारांना जोडले जातात.

सर्वधर्म समभाव पाहिजेच. भाऊंच्या नंतर दलूभाऊ करत होतेच. भाऊंचा आणि दलूभाऊंच्या मार्गदर्शनाखाली मी करत आलेलो आहे. माझ्यानंतर मुलांनी केले पाहिजे. ते करतील.

दुसरा अजून एक विषय होता की आपण जे म्हणाला की अजून तीन भावांच काय? तर असे आहे की बोटे सारखी नसतात तशी भाऊंची आम्ही चार मुलें आहोत. तर मी मागेही एका इंटरव्ह्युमध्ये बोललो होतो की करोडोमध्ये एक भाऊ तयार होतो. भवरलाल जैन अशी व्यक्ती करोडोमध्ये एखादी तयार होते ती काही अशी गल्ली-बोळात नाही होऊ शकत तर आम्हाला प्रश्न विचारण्यात आला की तुमच्या चारींपैकी भवरलालजी कोण ? तर त्याच्यावर माझं असं उत्तर असते की भवरलालजी जैन मधले जे काही गुण आहेत ते आमच्या चारांमध्ये वाटले गेलेले आहेत. त्याच्यामुळे चारही आम्ही भवरलालजी आहोत. भाऊ असोत किंवा नसोत हे काम कंटीन्यू राहील.आमचा प्रयत्न तोच राहील की हेच सगळे संस्कार येणाऱ्या पीढीला आम्हाला देता आले पाहिजे.

प्रश्न- गांधींच्या ट्रस्टीशीपचा विचार पहिल्यांदा जमनालाल बजाज यांच्या फॅमिलीमध्ये आला. नंतर आला तो खिरापी स्टील मध्ये आणि आत्ता अलिकडे आला तो अजिम प्रेमजी यांच्यामध्ये. त्याच्यानंतर चौथी कार्पोरेट सेक्टरमधली फॅमिली आपली आहे. हा दृष्टिकोन या पद्धतीने पुढे जाईल का ?

उत्तर- बजाजच्याही अगोदर हा विचार आला टाटांमध्ये. म्हणजे जमशेटजी टाटांपासून त्यांच्या सिस्टीममध्ये ट्रस्टीशीप आहे. जमनालालजी बजाज गांधीजींबरोबर जुळल्यानंतर त्यांच्यात आला. त्यांच्यातल्या एक मुलाने वाहून घेतलं आहे या कामांसाठी. बिर्लामध्ये तर तो संपला आहे विषय सगळा. म्हणजे गांधीजींच्या काळातल्या दोन मोठ्या फॅमिलीज होत्या ज्यांनी दिवस-रात्र गांधीजींबरोबर काम केले ते आता त्या दुसऱ्या तिसऱ्या पीढीतच संपल्यासारखे आहे.

जमनालालजी, रामकृष्णजी, राहुलपर्यंत ते आहे, त्यांची जी दुसरी फांदी आहे-शिशिर बजाज. म्हणजे जमनालालजी, रामकृष्णजी, शिशीरमध्ये ते आहे. आणि शिशीर बजाजांचाच एक मुलगा आहे. कुशाग्र बजाजचा भाऊ. तो १०० परसेंट याच्यात आहे. म्हणजे चौथ्या पिढीत तिथे अजून आहे. परंतु ट्रस्टीशीप जी मी तुम्हाला सांगितली, आमची स्वत:ची, ती आम्ही स्वत:हून सांगितले की आपले सगळे जे आहे ते

ट्रस्टला द्या. तर ती ट्रस्टीशीपची भावना आली म्हणूनच तो विचार आमच्या मनात आला. आणि आम्ही त्यावर अमल करायला सांगितले आज कंपनीत ८ हजार लोक आहेत. जर ट्रस्टीशीप नसती तर आपण एवढं मोठे काम उभेच करु शकलो नसतो. आणि आम्ही जी कन्सेप्ट राबवली आहे 'मी माझ्या कामाचा मालक आहे. मालका सारखा वागेन' म्हणजे ट्रस्टीशीप. आजपर्यंत जे करत आलो हे १९६३ चे आहे. छोट्या-मोठ्या प्रमाणात. परंतु आत्ता हा 'माईल स्टोन' आहे. गांधीजींचा जो काही विषय भाऊंनी उभा करायची सुरुवात केली आहे आणि जे मूर्त स्वरुप येणार आहे. तो कळसं आहे.

प्रश्न- गंगेतले पाणी तीर्थ म्हणून पितात तसे हे गांधी विचारांचे तीर्थ आहे. आचरणात आणाल तर त्याचे महत्व अजून वाढेल मी त्यांना वाचत आलो. साबरमती, सेवाग्राम, वर्धा, दिल्लीला गेलो. स्मृति स्थळे, आश्रम बघितले आणि भावले. आणि या कामात पूर्णपणे रस घेऊ लागलो. मला आनंद याचा वाटतो की, आमच्याकडे आर.एस.एस. चे दोन तरुण आले. त्यांना काम दिले. ते आज पूर्णपणे बदलले आहेत त्यांनी कबुल केले की आम्हाला फक्त एकचबाजू माहित होती. मला वाटते की माझ्या कामाच्या पद्धतीचा हा विजय आहे.

प्रश्न-ही जी सगळी जबाबदारी आपल्यावर आली हा योगायोग, पूर्वसंचित की नियतीने टाकलेली जबाबदारी आपण मानता ?मला असं वाटत की एकतर मी ज्या धर्मात जन्म घेतला तो सगळ्यात मोठा भाग आहे. ह्या सगळ्या गोष्टी येण्यामध्ये ती पहिली गोष्ट.

दुसरी गोष्ट जेव्हा तुमचा जन्म होतो, जन्मानंतर तुम्ही जसजसं सगळीकडे बघत बघत मोठे होत असतात तर त्याचवेळी लहानपणात तुमच्यावर जे संस्कार घडत असतात. त्या काळातले शिक्षक, त्या काळातली शाळा आणि त्या काळातले वातावरण याचाही इम्पॅक्ट आमच्यावर झालेला आहे, गांधीजींच्या विचारांचा.

दुसरा जसा मोठा होत गेलो शिक्षण करत गेलो त्यावेळेला वेगवेगळ्या विचारांच्या लोकांशी डायलॉग किंवा चर्चा करण्याचे प्रसंग आले भरपूर. आणि जळगावलाच राहत असल्यामुळे घरातला मी मोठा मुलगा असल्यामुळे साहजिक सोशल वर्कची जबाबदारी माझ्यावर आली, त्याच्यामुळे मला वेगवेगळ्या विचारांचे लोकं, संघटना यांच्याबरोबर इंट्रॅक्शन करण्याचा योग आला आणि त्याच्यात मग मला गांधीजींचा मुद्दा मांडण्यासाठी खूप वेळा संधी व प्रेरणा मिळाली, तो योगायोगच म्हणावा लागेल.

प्रश्न- त्याकाळात ह्या पूर्ण खान्देशवरती सानेगुरुजीचा प्रभाव होता आणि सानेगुरुजी म्हणजे गांधीचे शिष्योत्तम, तर त्यांचाही काही परिणाम एकंदरीत तुमचे वाकोद गावातली फॅमीली म्हणून झाला असेल. तुमचे बाबा राष्ट्र सेवा दलात होतेच.

उत्तर- होते असे आहे की, माझा जन्म झाला त्याच काळात साने गुरुजींनी देह सोडला. त्याच्यामुळे मला सानेगुरुजी बघायला मिळाले नाहीत. परंतु मला स्वत:ला मराठी वाचण्याची खूप आवड असल्यामुळे माझ्याजवळ सुमारे ५०० पुस्तके आहेत मराठी. आजही माझी लायब्ररी आहे. त्याच्यामुळे सानेगुरुजींचा पहिला माझा जो परिचय झाला तो 'शामची आई' या पुस्तकातून झाला. ते वाचल्यानंतर मग सानेगुरुजी काय हे समजण्याचा प्रयत्न मी केला. त्यातून परिणाम आमच्यावर झाला. त्यामुळे साने गुरुजींचा पिक्चर बनविण्यात सहकार्य केले. चांगला पिक्चर निघाला. त्याच्यामध्ये अजून मी सानेगुरुजींना जवळून बघू शकलो.

गुरुजीच्या खान्देशातल्या कामाचा परिणाम दलूभाऊ आणि भाऊंवर अधिक झाला. मी विनोबांचे पवनारमध्ये जाऊन दर्शन घेतले आहे. त्यांचे भाऊ शिवाजीराव भावे यांना ८ ते १० वेळा भेटलो धुळ्याला- दलूभाऊंच्या सासूबाई सुराणा त्यांच्या कार्यकर्त्या होत्या. त्यांच्या समवेत जात असे नंतर मग विनोबांवर एक पुस्तकही प्रकाशित केले. म्हणून आपल्या पद्धतीने आपल्या परीने त्या त्या क्षेत्रामध्ये काम करत रहावे आणि लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करावा. हजारोमध्ये दहा माणसांवर त्या विचारांचा प्रभाव पडला तरी आपल्याला यश मिळालं असे आपण समजावं.

*-मुलाखतकार*

*डॉ. सुगन बरंठ*

*लोकसमिती, साने गुरुजी रुग्णालय,*

*कॅम्प मालेगांव जि. नाशिक*

विशेष

# शेती हे ब्रह्मकर्म मानणाऱ्या भाऊंच्या जीवनाचे अधिष्टान-लोककल्याण

- न्या. चंद्रशेखर धर्माधिकारी

**आजच्या मानवासमोर ज्या प्रकारच्या समस्यांची आव्हाने उभी आहेत ती म.गांधीजींच्या समोर नव्हती. त्या समस्यांची अथवा प्रश्नांची उत्तरे गांधीजी लिखित साहित्यात सापडत नाहीत ती शोधावी लागतात. ही उत्तरे त्यांच्या सत्याच्या प्रयोगातून अथवा जीवनाच्या प्रयोगशाळेतून, जीवन मूल्यांमधून शोधून पुढच्या पिढ्यांपर्यंत पोहचविली पाहिजेत. आजच्या तरुण पिढीपर्यंत ती जीवन मूल्ये आमची पीढी पोहचवू शकली नाही म्हणून प्रायश्चित्ताच्या भूमिकेतून भवरलाल भाऊ जैन यांनी गांधी संशोधन केंद्र व गांधीतीर्थ उभे केले आहे. अशी नम्र भावना गांधी रिसर्च फाऊंडेशनचे अध्यक्ष न्या.चंद्रशेखर धर्माधिकारी यांनी आपल्या लेखातून व्यक्त केली आहे. ती कालोचित्तच म्हणावी लागेल. – संपादक**

श्री. भंवरलालजी जैन उर्फ मोठे भाऊ हे माझ्यापेक्षा दहा वर्षांनी लहान आहेत, तरीही मी त्यांचा उल्लेख 'मोठेभाऊ'च म्हणून करु इच्छितो. कारण त्यांनी त्यांच्या जीवनांत जे उन्हाळे–पावसाळे पाहिले व अनुभवले आहेत व त्यांतून जो बोध घेतला आहे. ते माझ्या दृष्टीने अधिक महत्वाचे आहे. त्यांनी स्वत:चे आत्मचरित्र ती आणि मी या नावाने लिहिले आहे, त्यातून त्यांच्या जीवनाचे मूल्य त्यांनाच कळू शकेल, ज्यांनी तसे प्रसंग आपल्या सशक्त खांद्यावर तोलले आहेत. आपल्या देशात 'सत्ता' व 'संपत्ती' पेलत नाही, असे सत्ताधारी व उद्योगपतीही आहेत. परंतु भंवरलालजींना मी 'उद्योगमित्र' किंवा 'उद्योगसेवक' म्हणणे अधिक पसंत करीन. कारण संपत्तीचा सदुपयोग कसा करावा हे त्यांच्या जीवनशैलीतून सहजरीत्या उमजते. त्यांच्या जीवनशैलीला एक तात्विक अधिष्ठान आहे. ते 'लकीर के फकीर' नाहीत तर नवी स्वप्ने बघून त्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरविण्याची कला त्यांना साधली आहे. भगिनी निवेदिताने भारतीय मानसिकता व संस्कृतीची लक्षणे सांगताना म्हटले आहे की त्यांत 'सामंजस्य' संवादित, व संगतीकरण, या मूल्यांचा त्रिवेणी संगम आहे. भंवरलालजींचा जीवन प्रवास या मूल्यांच्या दिशेने होत गेला, आणि होत आहे. त्यांची सामाजिक बांधीलकी सर्वश्रुत आहे.

त्यांची माझी पहिली प्रत्यक्ष भेट उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या प्रथम दीक्षांत समारोहाच्यावेळी झाली. मी दिक्षांत समारोहाचा प्रमुख अतिथी होतो. दीक्षांत भाषणांत मी महात्मा गांधीजींची जीवन मूल्ये व त्यांचे शिक्षण विषयक विचार यांचा उहापोह केला. भाषणानंतर भंवरलालजी मला भेटायला आलेत. त्यावेळी विद्यापीठाचे कुलगुरूही हजर होते व म्हणाले की, 'विद्यापीठ जर गांधी विचारावर आधारित एखादे केंद्र प्रस्थापित करणार असेल तर त्याचा संपूर्ण खर्च मी (भंवरलालजी) करायला तयार आहे'' ही माझ्यासाठीच नव्हे तर कुलगुरूसाठीही नवीनच कल्पना होती. परंतु भाऊंसाठी तो त्यांच्या स्वभावाचा अविभाज्य भाग होता त्यांची गांधी व गांधी विचारांवर श्रद्धा होती हे मला प्रकर्षाने जाणवले. व ती त्यांची वृत्तीच आम्हा दोघांमधील संबंधांचा दुवा आहे. तसे केंद्र विद्यापीठात त्यांच्यामुळेच स्थापन झाले. समवैचारिक बांधीलकी नव्हे तर सामालकी मुळे मी त्यांच्याशी जोडला गेलो, ते तेव्हापासून आजतागायत. त्यांच्या जीवनांत जैन धर्मातील कर्मकांडा पेक्षा, त्यांतील अध्यात्मिक मूल्यांना अधिकस्थान आहे. आणि तेच अधिक मोलाचे आहे. भवरलालजींनी ती मूल्ये यथाशक्ति सांभाळली आहेत. 'भोग संस्कृती' व 'त्याग संस्कृती' अशा दोनच प्रकारच्या संस्कृती आहे. त्या 'पौर्वात्य किंवा 'पाश्चिमात्य' या नावाने ओळखल्या जातात हे खरे आहे. परंतु त्याचा मूळ गाभा 'त्यागभावना' व 'भोगवृत्ती' यातच सामावलेला आहे. 'अपरिग्रह' ही भौतिक संकल्पना नाही तर ती वृत्ती आहे. ते एक सांस्कृतिक मूल्य आहे. ज्याचे दर्शन भंवरलालजींच्या दैनंदिन 'खाजगी जीवनात आढळते. अगदी पोशाकापासून तर खानपानापर्यंत म्हणूनच कदाचित त्यांना गांधी व त्यांचे विचार, जे अहिंसा, सत्य, अस्तेय, व अपरिग्रह यावर प्रामुख्याने आधारलेले आहेत. ते भावले. त्यांना मूर्तस्वरुप देऊन ते इतरापर्यंत पोहचावेत म्हणून त्यांनी आयुष्याच्या संध्याकाळी 'गांधी रिसर्च फाऊंडेशन' म्हणजे 'गांधी संशोधन प्रतिष्ठान' व 'गांधीतीर्थ' यांची प्रतिष्ठापना

करण्याचे ठरविले. संशोधन फक्त इतिहासाचे किंवा भूतकाळाचे नसते तर इतिहासाचा अभ्यास व संशोधन वर्तमान काळात जगण्यासाठी आणि भविष्य कवेत घेण्यासाठी करावयाचा असतो. म्हणून अनेकदा वर्तमानकाळाचेही संशोधन करणे गरजेचे असते. कारण आजच्या ज्या समस्या आपणासमोर आहेत, त्या गांधीच्या समोर नव्हत्या व त्यांची 'रेडीमेड' उत्तरे गांधीच्या पुस्तकांत सांपडत नाहीत तर ती शोधावी लागतात. त्यांसाठी माझे जीवनच-माझा संदेश आहे असे नम्रपणे म्हणणाऱ्या महात्म्याच्या जीवन मूल्यातून ती शोधून काढून पुढच्या पिढ्यापर्यंत पोहचविण्याची गरज आहे. आजच्या तरुण पिढीसमोर आदर्शच नाहीत असे म्हणणारी माझी पीढी ते आदर्श व ती मूल्ये पुढील पिढीपर्यंत पोहचवू शकली नाही. ह्या आमच्या पीढीच्या नाकर्तेपणा बद्दल पायश्चिताच्या भूमिकेतून 'गांधी संशोधन केंद्र' व 'गांधीतीर्थ' या भंवरलालजींच्या स्वप्नपूर्तीकडे बघावयास पाहिजे. आज दुर्देवाने गांधीजनांपैकी काहींनी 'गांधीच्या जीवनाची' नक्कल केली पण त्यांच्या 'संदेशाचा' त्यांना विसर पडला आणि जे गांधीचा संदेश आम्हाला कळला असे म्हणतात ते 'गांधीचे जीवन' व त्यांत सामावलेला गांधी व त्याचे जीवनदर्शन विसरले त्यांनी 'जीवन' व 'संदेश' यात फारकत केली त्यामुळे आता पुन्हा गांधीचे जीवन त्यांचा संदेश यांचा शोध घेण्याची गरज आहे. कारण गांधीचे जीवन समग्र होते. व ती समग्रता हेच त्यांचे जीवन मूल्य होते. यास 'सम्यकदर्शन' म्हणतात. या दर्शनाचे तीन अर्थ आहेत. एक तर ते उचित हवे, असंदिग्ध हवेआणि 'समग्र' हवे. आज आपण ज्याला गांधीचे 'तत्वज्ञान' म्हणतो त्याने 'गांधीच्या जीवन दर्शनाचेही'' खरे दर्शन होत नाही. म्हणूनच तर गांधीजी म्हणाले होते की 'गांधीवाद' नांवाचा कुठलाही उपद्रव मी करुन ठेवला नाही. कारण गांधी विचारांचा 'गांधीवाद' झाला तर विचार गोठतो. तो मग प्रवाहित राहत नाही. म्हणून त्या दर्शनावर आधारित किंवा त्याचा विचार करुन नवीन समस्यांवर तोडगा शोधावा लागतो. हिच गांधी संशोधन प्रतिष्ठानची भूमिका आहे. तेच खऱ्या अर्थाने भंवरलालजींचे स्वप्न आहे. गांधीजी व त्यांचे विचार प्रवाहित ठेवणे ही त्यांची जीवन साधना आहे. जगातील गांधी विचारावर आधारित सर्व पुस्तके, जी स्वत: गांधीनी लिहीली असतील किंवा त्यांच्या वर त्यांच्या विचारांवर लिहीली गेली असतील, त्यांचा संग्रह करणे, गांधीची मुद्रा जेथे जेथे उमटली असेल, त्याचा व त्यांनी वापरलेल्या वस्तूंचा संपूर्णत: संग्रह करणे, हे गांधीचे 'जीवन व दर्शन' कळण्यासाठी आवश्यक आहे. कारण 'वस्तू'लाही मत असते, त्यामागे एक विचार सरणी आहे. त्यात भावनाही दडलेली असते. व त्या वापरणारा माणूस कसा होता, त्यांची 'जीवनमूल्ये' कुठली होती याचेही दर्शन त्यांतून घडत असते. खिस्तापूर्वी १४ व्या शतकांत ऑसिमिडीस या राजाने इजिप्त मध्ये एका देवळांत ग्रंथ संग्रहालय काढले व नांव ठेवले 'आत्मरुग्णालय' आत्म्याला होणाऱ्या वेदनांचा चिकित्सेचा व त्यावरील 'औषधोपचाराचा दवाखाना असेच कांहीसे प्रतिष्ठानचे स्वरुप व भूमिका आहे. आपण हे विसरता कामा नये की भूतकाळाचा शोध हेच भविष्यकालीन पुनरुज्जीवनाची सुरवात असते. इतिहास म्हणजे मानवी जीवनाचा विकासक्रम, जीवनाचा हेतू व त्याची कृतार्थता त्यांतून जीवनाचे रहस्य कळते. खऱ्या अर्थाने समाजाचे 'कॉन्शन्स' बनविण्यासाठी ज्यांनी प्रयत्न केले त्यांचे जीवन म्हणजे इतिहास. ज्यांतून नवनिर्मितीची प्रेरणा मिळते. कागदावर लिहिलेले ग्रंथ नाश पावतात. किंवा आलमारीत बंदिस्त होतात म्हणून आपल्या पूर्वजांनी तो पाषाणावर शिल्प अगर चित्र रुपाने कोरुन ठेवला आहे असे राम मनोहर लोहिया म्हणाले होते. ती खऱ्या अर्थाने मानवतेची महान गाथा असते. तसेच ते 'प्रेक्षपण केंद्र' आणि 'श्वसन केंद्रही असते. हीच 'गांधीतीर्थ' या वास्तु मागील भंवरलालजीची संकल्पना आहे. तिथे संशोधनाची, अभ्यासाची, चिंतनाची सोय असेलच तसेच तेथे गांधी विचारांचे दर्शनही घडेल, ते 'म्युझियम' किंवा फक्त प्रदर्शन नव्हे तर ते गांधीच्या जीवन दर्शनाचे 'दर्शन केन्द्र' असेल. ते दर्शन जुन्या पुराण्या चष्म्यातून न पाहता. भविष्य काळाच्या दुर्बिणीतून पहावे लागेल. तेव्हाच त्यांतील खरे दर्शन 'प्रत्ययास येईल. तो भविष्य काळातील पुनरुज्जीवनाचा शोध असेल. त्यांतून कळेल की गांधीना अभिप्रेत असलेली जीवन मूल्ये कशी सिद्ध होत गेलीत. कशी सिद्ध होऊ शकतात. ह्यांचे स्वरुप व मार्ग यांतून उदयास येतील. एका अर्थाने ते गांधींच्या जीवन मूल्याचे व विचारांचे ठिबक सिंचनच आहे.

भंवरलालजींचे कार्य शेती, 'शिक्षण, सामाजिक कार्य या क्षेत्रात आहे. शेती हे ब्रह्मकर्म आहे. म्हणजे ब्रह्मदेवा पत्राचे ते निर्मितीचे कार्य आहे. या सर्वात भाऊंची वैशिष्टयपूर्ण विचारसरणी सामावलेली आहे. त्यांचे पाय खानदेशच्या जमिनीवर असले तरी त्यांच्या दर्शनाचा आवाका विश्वव्यापी आहे. त्यांच्या उद्योगात व व्यवहारांतही दानाची नव्हे विश्वासाची भावना आहे. कमावलेला पैसा लोककल्याणाच्या कामीच वापरावा अशी त्यांची भावना असते. त्यांत दाना ऐवजी शेअरींग ची म्हणजे सहभागाची व सहयोगाची भावना अधिक आहे. खानदेशात माणसाला संबोधताना 'भाऊ' म्हणतात. हे 'भाऊ प्रेम' त्यांच्या जीवनाचे अधिष्ठान आहे. त्यांचा परिवार संयुक्त कुटुंब संस्थेचे अनोखे प्रतीक आहे. भारतातील पहिले खेड्यातील कॉंग्रेसचे अधिवेशन फैजपूर येथे झाले होते. अहिंसेच्या मार्गाने स्वराज्य आणि तेही ग्रामस्वराज्याच्या माध्यमातून स्थापन करण्याच्या मार्गावरील ते पहिले पाऊल होते. याच भावनेतून भाऊची 'ग्रामशिल्पी' योजना अस्तित्वात आली. आचार्य विनोबाजी म्हणाले होते, खानदेशात त्रिवेणी संगम आहे. एकाबाजूला विदर्भ, दुसऱ्या बाजूला गुजराथ, तर तिसऱ्या बाजूला हिंदी प्रदेश आहे. म्हणजे खानदेश मध्ये साने गुरुजींच्या आंतर भारतीची वृत्ती आहे व त्यामुळे पारस्पारिक अनुराग प्रेम हा मोठा गुण तेथे आढळतो. कारण येथे जसा संस्कृति संगम आहे. तशीच त्यास सतकृतिची जोड प्राप्त झालेली आहे. तापी नदीच्या संगमावर प्रकाशे येथे गांधीच्या अस्थि स्थिरावल्या आहेत. त्या संगमावरील घाट देवी अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेला आहे. आणि अहिल्या देवींचे प्रसिद्ध वाक्य आहे. ''वाहून गेली ती गंगा व उरले ते तीर्थ'' असे 'गांधीतीर्थ' उभारणे व जोपासणे हे भाऊंचे स्वप्न सर्वार्थाने साध्य होईल अशी अपेक्षा आहे व त्यासाठी त्यांना दीर्घ व स्वस्थ आयुष्य लाभो हीच परमेश्वरचरणी धर्माधिकाऱ्यांची प्रार्थना आहे.

'शेषम्, स्नेहन्, पूरयेत् '

*८ अ,*
*'समता ', जनरल भोसले मार्ग,*
*मुंबई – २१*

## समाजाच्या चित्तशुद्धीसाठी उपयोगी पुसदचे सर्वधर्म समन्वय मंदिर

सन १९७८ साली पुसदच्या मातोश्री विठाबाईंनी पू. विनोबाजींना सुमारे साडेतीन एकर जमीन दानात देतांना स्वत:ची इच्छा व्यक्त केली होती की, त्या जागेत कृष्णमंदिर उभे व्हावे. विठाबाईंची ही कृष्णभक्ति लक्षात घेऊन विनोबांनी तेव्हा त्यांना एक लहानशी मुरलीधर कृष्णाची मूर्ति पण दिली होती. ही जागा वाशिम रोडवर, शिवाजी हायस्कूलला लागून आहे. पुढे ह्या जागेचे 'मातोश्री विठाबाई मारोतराव ट्रस्ट' या नावाने सार्वजनिक कार्यासाठी रजिस्ट्रेशन करण्यात आले. ह्या संस्थेचा दरवर्षी हिशोब ऑडिट होत असतो. आज ही जागा **'गीताई सेवा केंद्र'** या नावाने ओळखली जाते. आता तेहतीस वर्षांनी मातोश्री विठाबाईंची इच्छा अभिनव रूपाने साकार करण्याचा योग येत आहे. विनोबांनी आपल्या जीवनात अनेक कामे केली. त्यापैकी भूदानाचे त्यांचे कार्य जगजाहीर आहे. त्यांचे सारे जीवन हृदये जोडण्यात म्हणजे समन्वयाच्या कार्यातच गेले. सर्व धर्मांचा अभ्यास त्यांनी आपलेपणाने केला. आणि त्या धर्मांचे सार त्यांनी जगापुढे ठेवले. विज्ञानामुळे जग अगदी निकट आल्याने परस्परांना पूरक झाल्याशिवाय या जगात गती नाही हे त्यांनी ओळखले होते. विठाबाईंची इच्छा आणि विनोबांची वैज्ञानिक दृष्टि यांचा मेळ घालून आता ट्रस्टच्या ह्या जागेत **'सर्वधर्म समन्वय मंदिर'** उभे करायचे ट्रस्टने ठरवले आहे. ह्या मंदिरात सर्व धर्मांनी मानवजातीला पुष्ट करण्यासाठी जी देणगी दिली ती त्या धर्मांच्या प्रतीक स्वरूपात दर्शविली जाईल. कालक्रमानुसार त्यांची मांडणी राहील. एकाच नजरेत ही सारी प्रतीके राहतील. यातून **'आपण सारे एकच आहोत'** अशी प्रेरणा मिळावी हा हेतू आहे. समाजाच्या चित्तशुद्धीसाठी हे मंदिर उपयोगी व्हावे अशर ह्यामागे तळमळ आहे. हे समन्वय मंदिर साधनेला पोषक राहील. बाह्य वैभवाचे किंवा भव्यतेचे प्रदर्शन करण्याचा ह्यामागे हेतू नाही. मंदिराच्या अनुषंगाने सर्व धर्मांच्या अध्ययनासाठी पुस्तकालय आणि उपासना-ध्यानासाठी स्थान राहील. शिवाय व्यायामशाळा, योगासनांची सोय राहील. बालकांसाठी एक संस्कार केंद्र पण चालवायचे आहे. ह्या सर्व प्रवृत्तींचा पाठीचा कणा आहे सेवक आणि साधक ! त्यांची व्यवस्था स्वावलंबनासह करावी लागणार आहे.

आजच्या युगानुकूल हे नवे कार्य उभे करायचे आहे. ट्रस्ट जवळ पैसा नाही. ८० G ची आजवर आम्हाला कधी गरजच पडली नाही. आपण आता जी मदत कराल त्याची अधिकृत पावती आपल्याला मिळेलच. केवळ पैशाच्या रुपातच नाही. तर

*(पान नं. २३ वर)*

मंथन
भाग–१८

# बाळकोबांचे अभिनव गीता भाष्य; संकुचित परोपकार नको

- प्राचार्य डॉ. विश्वास पाटील

**जड चेतन सृष्टीत परोपकारी वृत्ती स्वभावत: असते. सृष्टी आपल्याकडे काहीच राखून ठेवत नाही. जे जे आहे ते सर्व आपल्याला देत असते. त्याच पद्धतीने मानवी जीवनात परोपकार व्यापक असला पाहिजे. तो संकुचित असता कामा नये. तो संकुचित ठेवल्यास दु:खे माणसाला सतावत राहतील. दूर जाणार नाहीत. अशा प्रकारे परोपकारावर बाळकोबांनी मौलिक भाष्य केले असून लेखकांनी हा महत्त्वाचा मुद्दा सदर विश्लेषणातून अधोरेखित केला आहे. संपादक**

या दोन श्लोकांमधून एक मुद्दा स्पष्ट होतो. चौदाव्या श्लोकात चार मुद्दे आहेत. एक सर्व प्राणीमात्रांची उत्पत्ती अन्नामुळे होते. दोन पावसामुळे अन्न निर्माण होते. तीन यज्ञामुळे पाऊस पडतो. चार कर्मातून यज्ञ घडतो.

अन्नातून सर्वांची उत्पत्ती होते. भोजनामुळे रक्त बनते. वीर्य उत्पन्न होते. यातून प्रजेची उत्पत्ती होते. यासाठी आचरण पवित्र व संयमी असावे.

पावसामुळे शेती पिकते. पावसाअभावी जीवन संकटमय होईल. पावसाचे उपकार अनंत. पाऊस देवता. पर्जन्य देवता.

यज्ञामुळे पाऊस पडतो. जुन्या काळी प्रचंड अरण्ये होती. लोक एकत्र जमत. लाकडं जाळत. यातून यज्ञाचे स्वरुप बनले. समिधा, आहुती असे शब्द आलेत. मंत्र ठरवले गेलेत. या कामाला धर्माचे रुप दिले गेले. यज्ञाचा अर्थ हवन असा झाला. ते अग्नीचे मंत्र म्हणत. प्रदक्षिणा घालत. उपासना करत. अग्नीत समिधा टाकत. तूपाची आहुती देत. ही आहुती सूर्याला पोचायची. या यज्ञामुळे म्हणजे सूर्यामुळे पाऊस पडायचा. पावसाने शेती पिकायची. शेतीने प्रजा उत्पन्न व्हायची.

परिस्थिती बदलली की शब्दांचे अर्थ बदलतात. आज जंगलं कुठायत ! आज झाडं वाढवणं–जगवणं हाच यज्ञ आहे.

यज्ञ शब्दाचा मूळ अर्थ सृष्टीच्या कल्याणासाठी केले गेलेले कर्म असा आहे. यज्ञाचा अर्थ परोपकार मानला तर 'यज्ञामुळे पाऊस पडतो' या वाक्याची अर्थसंगती कशी लावायची ? पाऊस सूर्यामुळे पडतो. सूर्य नसेल तर पाऊस पडणार नाही. सूर्याच्या तापामुळे वाफ. वाफेमुळे ढग बनतात. ढगांमुळे पाऊस बरसतो. जगायला लागते उष्णता. ती सूर्यापासून लाभते. आवश्यक ती उष्णता नाही मिळाली म्हणजे माणूस जिवंत राहू शकणार नाही. सूर्य कमालीचा वक्तशीर आहे. त्याच्या गतीत यत्किंचितही फरक पडत नाही. आपण भोजन करतो. भाज्या खातो. सर्व वनस्पतींच्या ठायी सूर्यकिरणांमुळे जीवनसत्वे निर्माण होतात. सूर्य पृथ्वीला आकृष्ट करतो. सूर्यामुळेच पृथ्वी अवकाशात तरंगती आहे. सूर्य मोठा परोपकारी. असा दुसरा परोपकारी कुणी नाही. उपनिषद म्हणते की सूर्य सर्वांचे नेत्र. एकटा सूर्यच नव्हे, पण समस्त जड सृष्टी आपल्यावर उपकार करते. आंब्याचे झाड आंबे देते. पान असो वा फूल, फळ असो वा डहाळी. गवत असो वा वृक्ष, माती असो वा दगड सर्वांचाच आपल्याला काही ना काही उपयोग होतो. अशाप्रकारे सारी सृष्टी यज्ञ करतेय. आपल्यालाही नि:स्वार्थी बनावे लागेल. यज्ञमय जीवनाचा आदर्श मनाशी बाळगावा लागेल. नव्याने वाटचाल करावी लागेल.

यज्ञ कर्मातून संभवतो. या अध्यायाच्या सुरूवातीला अर्जुनाचा प्रश्न होता. कर्मापेक्षा निष्कामता, निर्विकारता, समता जर श्रेष्ठ असेल तर मग भगवंता, मला या भयंकर कर्मात का जोडताहात ? का प्रवृत्त करताहात ? याचे इथे सविस्तर उत्तर दिले गेलेय. एक–एक कारण भगवंत सांगताहेत. यज्ञ समजून घेऊन कर्म करावे. यज्ञ म्हणजे परोपकार वृत्ती. काहीतरी भरीव कार्य करून जीवन घालवावे. निष्क्रिय बनून काही न करणे ही तमोगुणी वृत्ती आहे. परोपकार म्हणजे सत्वगुणाचा विकास. स्वार्थी जीवन नसावे. पुरूषार्थाने वा सक्रियतेने समाजाचे भले होणार असते. कर्म म्हणजे यज्ञ कर्म. हा परम पुरूषार्थ. श्रेष्ठ पुरूषार्थ. हे सात्त्विक कर्म. हे सामान्य कर्म नव्हे.

यज्ञाची उत्पत्ती सात्त्विक कर्माने होते हे मागील श्लोकात

सांगितले गेलेय. हे कर्म कसे उपजते ? त्याची इथे चर्चा आलीय.

ब्रह्म हे कर्माचे आदिकारण. ब्रह्म मुळे कर्म उत्पन्न होते. 'ब्रह्म' म्हणजे काय? ब्रह्म म्हणजे ना परमात्मा वा ना साऱ्या सृष्टीचे मूळकारण–ब्रह्म अक्षरातून जन्माला येते. ब्रह्म जन्माला येत असेल तर मूळ कारण कसे बरे होईल ? आदि कारण कसे बरे ठरेल ? कार्याचे कारण कसे उत्पन्न होईल ? आदि अनित्य असते.

चौदाव्या अध्यायाच्या तिसऱ्या श्लोकात भगवंताने असे सांगितलेय– "माझी योनी म्हणजे प्रकृती वा माया शक्ती फार मोठी आहे. यात अभिन्नता आहे. याला ब्रह्म म्हणतात. त्याठायी मी सर्व भूतमात्रांचे बीज रोपतो. या बीजातून तमाम भूतमात्रांची उत्पत्ती होते. " इथे ब्रह्म शब्दाचा अर्थ प्रकृती वा माया शक्ती आहे. प्रकृती वा माया मूळ ब्रह्मापासून स्वतंत्र नाही. सांख्य प्रकृतीला स्वतंत्र वा माया शक्तीला स्वतंत्र मानते, जड ही मानते. गीतेचे म्हणणे असे नाही. गीता प्रकृती वा माया शक्तीला स्वतंत्र मानत नाही. परमात्म्याच्या ठायी निवास करते. परमात्म्याशी एकाकार आहे. एकरूप आहे. भगवंताच्या ठायी दोन शक्ती वसतात. चैतन्य शक्ती म्हणजे ज्ञानशक्ती आणि सर्ग शक्ती म्हणजे निर्मिती करणारी शक्ती. भास करणाऱ्या शक्तीला प्रकृती किंवा माया म्हटले जाते. या मायेच्या वा प्रकृतीच्या ठायी तीन गुण वसतात. सत्व, रज आणि तम. यामुळे ही त्रिगुणात्मिका प्रकृती वा माया ठरते. या त्रिगुणात्मक प्रकृतीमुळे सात्त्विक, राजसिक आणि तामसिक तीन प्रकारची कर्मे उत्पन्न होतात. इथे ज्या यज्ञकर्माचा उल्लेख आहे ते सात्त्विक यज्ञकर्म होय. अशाप्रकारे प्रत्येक कर्म वा क्रियेचा आधार त्रिगुणात्मक प्रकृती आहे. त्रिगुणात्मिका प्रकृती तीन प्रकारच्या कर्मांना निर्माण करते.

हे ब्रह्म म्हणजे भगवंताची प्रकृती वा मायाही अक्षरापासून जन्माला आलीय. परमात्मा अक्षर आहे. अक्षीण आहे. शाश्वत आहे. अपरिवर्तनीय आहे. स्थिर आहे. अविनाशी आहे. प्रकृती वा माया स्वतंत्र नाही. परमेश्वराच्या अंतर्गत आहे. भगवंताच्या अधीन आहे. या मायेवर भगवंताच्या चैतन्य शक्तीचे पुरेपूर नियंत्रण आहे. प्रकृती वा मायेचा सारा पसारा ईश्वराधीन आहे. भगवंताच्या आज्ञेनुसार मायेचे कार्य सुयोग्य रुपात अखंडपणे चालत राहते.

प्रकृतीचे म्हणजे संपूर्ण जगताचे मूळ कारण म्हणजे मूळ आधार ब्रह्म आहे. परमात्मा आहे. यज्ञालाही याच भगवंताचा नित्य आधार असतो. यज्ञाच्या ठायी हे परमात्मतत्व नित्य प्रतिष्ठित असते. सदा विराजमान असते. ब्रह्म व परमात्म्याचे स्वरूप कसे? तो कुठे निवास करतो ? परमात्मा सर्वगत असतो हे या प्रश्नाचे उत्तर होय. 'सर्वाठायी रमणारा प्रभु एकाकी' ते एकटे परमात्मा तत्व सर्वांच्या ठायी रमते पण ते निर्गुण आहे, निराकार आहे, निर्विकार आहे. अगदी नजिक असले तरी आपल्याला त्याचा पत्ता लागत नाही. तरी भगवंत आपल्याला भान घडवून देतो की तो आपल्या इतक्या नजिक आहे की जणू आपले स्वरुपच आहे. आपण भगवंताहून मूळीच भिन्न नाहीत. असा अखंडपणे अनुभव यायला हवा. यामुळे आपल्या यज्ञमय जीवनात परमात्म्याच्या कृपेचा अनुभव घेता येईल. आपले संपूर्ण जीवन प्रभुमय करता येईल. यज्ञमय करता येईल. यज्ञ प्रकरणाचा अखेरचा श्लोक सोळावा. निर्माण करणारे यज्ञचक्र आहे. यात सहभागी न होणारे पापीजन. यज्ञचक्राचे अनुसरण न करणारे पातकी होत. इंद्रियांच्या ठायी आराम करणाऱ्याचे जीवन व्यर्थ होय.

:१६:

या श्लोकात दोन गोष्टींची चर्चा येते. एक सृष्टीत परोपकार वृत्तीचा उत्कर्ष करून जो सृष्टीचक्राला गतिमान करत नाही तो माणूस पापी होय. दोन जो इंद्रियांच्या विषयोपभोगात निमग्न झाला त्याचे जीवन व्यर्थ जाणावे.

सृष्टीच्या जड चेतन पदार्थाच्या ठायी काय आहे ? सूक्ष्म अभ्यास केला तर एक गोष्ट ध्यानात येते. सर्व पदार्थांमध्ये यज्ञीय वृत्ती आढळते. परोपकार वृत्ती आढळते. या अभावी सृष्टीचा क्रम चालूच शकणार नाही. ही वृत्ती स्वार्थी व्यक्तीच्या ठायीही आढळते. पराकोटीचा स्वार्थी माणूस असू देत बुडणाऱ्याला बघून मदतीला धावून जाईल, किमान प्रयत्न करील. प्रत्येकाच्या ठायी भगवंताने परोपकार वृत्तीची पेरणी केलीय. माणूस परोपकाराला प्रवृत्त होतो. माणूस एकटा नाही राहू शकत. तो समाजप्रिय आहे. समाजात

राहतो. तो समाजप्रिय-सामाजिक प्राणी आहे. पशुदेखील कळपाने राहतात. गाईला कळपातून वेगळी काढली तर ती घाबरुन जाईल. कळपाने राहण्याची तिला आंतरिक प्रेरणा लाभते. संकटकाळ आला तर सामूहिक बळ अवतरते. अगदी हिंसक पशुशी मुकाबला सामुदायिक बळाने केला जातो. पती-पत्नी सुध्दा एकमेकांना पत्करतात. खूप सहन करतात. त्याग करतात. संयमाने राहतात. हा प्रेम शक्तीचा चमत्कार आहे. ही कुटुंबीयांपर्यंत मर्यादित नको. सीमित प्रेमशक्ती दूषित होते. कुंठित होते.

जड सृष्टीतही परोपकार वृत्ती निहित असते. तिची ओळख आपल्याला नसते. सृष्टी आपल्याला सारे काही देते. स्वतःपाशी काही ठेवत नाही. अशा प्रकारे जड चेतन सृष्टीत परोपकार वृत्ती स्वाभाविकपणे असल्याचे ध्यानात येते. परोपकाराचा भाव व्यापक करण्याचा प्रयत्न केला जायला हवाय. परोपकार संकुचित नको. मर्यादित नको. अन्यथा दुःख कसे दूर लोटता येईल ? दुःख कमी कसे करता येईल ?

स्वार्थी माणूस पापी मानावा. परोपकार वृत्तीचा उत्कर्ष व्हावा. त्याशिवाय समाज टिकणार नाही. तो छिन्न-भिन्न होईल. द्वादशपंजरिका स्तोत्रात शंकराचार्य म्हणतात: '' हे माणसा, धनाने प्राप्त तृष्णेचा त्याग कर. सद्बुध्दीचा आश्रय घे. कर्माने धन मिळव. मनाला संतुष्ट ठेव. धनाच्या वैभवाला अनर्थकारी मान. अशी सतत भावना बाळग. धनवैभवात किंचितही सुख नाही. श्रीमंतांना आपल्या पुत्राचेही भय वाटते. हा प्रकार सर्वत्र दिसून येतो.

स्वार्थी जीवन विषयासक्त असते. परोपकार वृत्तीने स्वार्थवृत्ती हळूहळू क्षीण होईल. जीवन संयमी बनेल. संयमामुळे विषयांचे आकर्षण कमी होईल. मनावर नियंत्रण साधेल. बुध्दी विवेकसंपन्न होईल. अशा प्रकारे परोपकारात जीवन ऊर्ध्वगामी बनेल.''

केवळ स्वार्थाधारित जीवन जगणाऱ्याला व्यर्थ मानायला हवे. आपणा सर्वांना जागृत करण्यासाठी भगवंताने खूप कठोर शब्दांचा प्रयोग केलाय.

:१७-१८:

हे दोन श्लोक महत्त्वाचे आहेत. ज्यांनी भगवंताचा अनुभव घेतलाय अशा पुरूषाचे यातून वर्णन आले आहे. सतराव्या श्लोकात त्याची चार लक्षणे सांगितली आहेत. एक म्हणजे जो परमात्म्याशी रत असतो. दोन, परमात्म्याच्या ठायी तृप्त असतो. तीन, परमात्म्यातच तृप्त असतो आणि चार, या कारणामुळेच त्याला आपल्या स्वतःसाठी काही करावे लागत नाही. या दोन श्लोकात ज्ञानी पुरुषाची लक्षणे सांगितली गेली आहेत, ती एवढ्यासाठी की यामुळे ज्ञानी पुरुषाची स्थिती पूर्णपणे कळू शकेल. कुठलीही शंका रहाणार नाही. गैरसमज उरणार नाही. शंका अशी की ज्ञानी पुरुषासाठी कर्म करायची मूल्यवत्ता किती असते ? खरोखरच तो कर्म करील की नाही ? कर्म करील तर त्याचे स्वरुप काय असेल ? किंवा मग कर्म का नाही करणार ? तो स्वतःसाठी कर्म करील वा दुसऱ्यासाठी ? हे सारे धडपणे जाणून घेतले तर मनी शंका उरणार नाही. साधकावस्थेतली स्थिती प्रयत्नसाध्य असते. सिध्दावस्थेत म्हणजे ज्ञानावस्थेत ही लक्षणे सहज होतात, स्वाभाविक होतात. ज्ञानी पुरुष जर कर्म करीत नसेल तर मग साधकावस्थेत कर्म का करायला हवे याचे उत्तर संपूर्ण अध्यायभर देण्यात आले आहे पण कर्म करणे वा न करणे याबाबत ज्ञानी पुरुषाची स्थिती काय असते ? हे स्पष्ट व्हायला हवेय. हे समजाऊन सांगण्यासाठी हे दोन श्लोक.

पहिले लक्षण असे की ज्ञानी पुरुष परमात्म्याच्या ठायीच रत असतो. इथे शंका जागते की अज्ञानी का रत होत नाही आणि ज्ञानीच का रत असतो ? याचे उत्तर असे की ज्ञानी पुरुषाने परमात्म तत्व जाणून घेतले असते. मनात एक शंका येते. परमात्मा आहे याला पुरावा काय? सर्वात मोठा पुरावा तर आपण स्वतःच आहोत. आपण कोण आहोत याचा विचार करू या. आपण म्हणजे देह नाही. इंद्रिये नाहीत. ना मन ना बुध्दी, अहंकारही नाहीहोत आपण. कारण या सर्वांचे आपल्याला ज्ञान होते. हे आपल्यापासून भिन्न असतात म्हणून तर यांचे आपल्याला ज्ञान होते ना ?

*- कृष्णांबरी*
*सरस्वती कॉलनी,*
*शहादा, जि. नंदुरबार*
*दूरध्वनी : (०२५६५) २२५६२१*